भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# पालक आणि पाल्य अधिनियम, १८९०

(१८९० चा अधिनियम क्रमांक ८)

[ १ जून, १९७६ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Guardians and Wards Act, 1890

( Act No. 8 of 1890 )

[*As in force on the 1st June, 1976*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

(१९८१)

[किंमत—रु. १.१० पैसे]

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५).

२. 'पालक आणि पाल्य (विशोधन) अधिनियम, १९२६' (१९२६ चा ४).

३. 'पालक आणि पाल्य (विशोधन) अधिनियम, १९२९' (१९२९ चा १७).

४. 'विधि अनुकूलन आदेश, १९३७'

५. 'निरसन अधिनियम, १९३८' (१९३८ चा १).

६. 'अनुकूलन आदेश, १९४८'.

७. 'निरसन व विशोधन अधिनियम, १९४९' (१९४९ चा ४०).

८. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०'.

९. 'भाग ख राज्ये (विधि) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ३).

१०. 'पाँडिचरी (विधि विस्तारण) अधिनियम, १९६८' (१९६८ चा २६).

# पालक आणि पाल्य अधिनियम, १८९०

## कलमांचा क्रम

प्रास्ताविका.

प्रकरण १ ले

**प्रारंभिक**

कलमे

१. नाव, विस्तार आणि प्रारंभ.
२. [ निरसित ].
३. पाल्याधिकरणे आणि सनदी उच्च न्यायालये यांच्या अधिकारितेची व्यावृत्ती.
४. व्याख्या.
४ क. दुय्यम न्यायाधिकाऱ्यांना अधिकारिता प्रदान करण्याची आणि अशा अधिकाऱ्यांकडे कार्यवाही वर्ग करण्याची शक्ती.

प्रकरण २ रे

**पालक नियुक्त करणे आणि घोषित करणे**

५. [ निरसित ].
६. इतर बाबतीत नियुक्ती करण्याच्या शक्तीची व्यावृत्ती.
७. पालकत्वाबाबत आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.
८. आदेशासाठी अर्ज करण्यास हक्कदार असलेल्या व्यक्ती.
९. अर्ज विचारार्थ स्वीकारण्याची अधिकारिता असलेले न्यायालय.
१०. अर्जाचे प्ररूप.
११. अर्ज स्वीकृत केल्यानंतरची कार्यपद्धती.
१२. पाल्याला हजर करण्यासाठी आणि देहाचे व संपत्तीचे दरम्यानच्या काळात संरक्षण करण्यासाठी अंतर्वादिक आदेश देण्याची शक्ती.
१३. आदेश काढण्यापूर्वी पुरावा ऐकणे.
१४. वेगवेगळ्या न्यायालयांतील एकसमयावच्छेदी कार्यवाही.
१५. अनेक पालक नियुक्त किंवा घोषित करणे.
१६. न्यायालयाच्या अधिकारिता क्षेत्राबाहेरील संपत्तीचा पालक नियुक्त किंवा घोषित करणे.
१७. पालक नियुक्त करताना न्यायालयाने विचारात घ्यावयाच्या बाबी.
१८. जिल्हाधिकाऱ्यास पदाधिकारपरत्वे नियुक्त किंवा घोषित करणे.
१९. विवक्षित बाबतीत न्यायालयाने पालकाची नियुक्ती करावयाची नाही.

प्रकरण ३ रे

**पालकांची कर्तव्ये, अधिकार आणि दायित्वे**

**सर्वसाधारण**

२०. पालकाचे पाल्याशी विश्रब्ध नाते.
२१. पालक म्हणून कार्य करण्याची अज्ञान व्यक्तीची क्षमता.
२२. पालकाचे पारिश्रमिक.
२३. पालक म्हणून जिल्हाधिकाऱ्याचे नियंत्रण.

**देहाचा पालक**

२४. देहाच्या पालकाची कर्तव्ये.
२५. अज्ञान व्यक्तीच्या अभिरक्षेवर पालकाचा हक्क.
२६. पाल्याला अधिकारिता क्षेत्राबाहेर हलविणे.

**संपत्तीचा पालक**

२७. संपत्तीच्या पालकाची कर्तव्ये.
२८. मृत्युपत्रीय पालकाच्या शक्ती.
२९. न्यायालयाने संपत्तीचा जो पालक नियुक्त किंवा घोषित केला असेल त्याच्या शक्तींची मर्यादा.
३०. कलम २८ किंवा कलम २९ चे व्यतिक्रमण करून केलेल्या हस्तांतरणांची शून्यकरणीयता.
३१. कलम २९ खालील हस्तांतरणांना परवानगी देण्याबाबतचा प्रघात.

३२. न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेल्या संपत्तीच्या पालकाच्या शक्तींमध्ये फेरफार करणे.
३३. अशा तऱ्हेने नियुक्त किंवा घोषित झालेल्या पालकाचा, पाल्याच्या संपत्तीच्या व्यवस्थापनाच्या संबंधात न्यायालयाला आपले मत देण्याची विनंती करण्याचा अधिकार.
३४. संपत्तीचा जो पालक न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला असेल त्याच्यावरील आबंधने.
३४ क. हिशेब तपासण्यासाठी पारिश्रमिक देवविण्याची शक्ती.
३५. प्रशासन बंधपत्र घेतलेले असेल त्याबाबतीत पालकाविरुद्ध दावा.
३६. प्रशासन बंधपत्र घेतलेले नसेल त्याबाबतीत पालकाविरुद्ध दावा.
३७. विश्वस्त म्हणून पालकाचे सर्वसाधारण दायित्व.

**पालकत्वाची समाप्ती**

३८. संयुक्त पालकांमध्ये उत्तरजीवित्वाचा अधिकार.
३९. पालकाला काढून टाकणे.
४०. पालकाची कार्यमुक्तता.
४१. पालकाचा प्राधिकार संपुष्टात येणे.
४२. मृत, कार्यमुक्त किंवा काढून टाकलेल्या पालकाच्या उत्तराधिकाऱ्याची नियुक्ती.

## प्रकरण ४ थे

**पूरक उपबंध**

४३. पालकांचे वर्तन किंवा कामकाज यांचे विनियमन करणारे आदेश व त्या आदेशांची बजावणी.
४४. पाल्यास अधिकारिता क्षेत्रातून दूर हलविण्याबद्दल दंड.
४५. आज्ञाभंगाबद्दल दंड.
४६. जिल्हाधिकारी व दुय्यम न्यायालये यांचे अहवाल.
४७. अपीलपात्र आदेश.
४८. इतर आदेशांची अंतिमता.
४९. वादखर्च.
५०. उच्च न्यायालयाची नियम करण्याची शक्ती.
५१. न्यायालयाने अगोदरच नियुक्त केलेल्या पालकांना हा अधिनियम लागू असणे.
५२. [ निरसित ].
५३. [ निरसित ].
अनुसूची [ निरसित ].

# पालक आणि पाल्य अधिनियम, १८९०

## (१८९० चा अधिनियम क्रमांक ८)[१]

[२१ मार्च १८९०]

**पालक आणि पाल्य यांच्यासंबंधीचा कायदा एकत्रित आणि विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** पालक आणि पाल्य यांच्यासंबंधीचा कायदा संकलित आणि विशोधित करणे समयोचित आहे ; **त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

नाव, विस्तार आणि प्रारंभ.

१. (१) या अधिनियमाला 'पालक आणि पाल्य अधिनियम, १८९०' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [२][[३]* * * जम्मू आणि काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर] आहे ; [४]* * *

(३) १ जुलै, १८९० या दिवशी तो अंमलात येईल.

२. [निरसित.] 'निरसन अधिनियम, १९३८' (१९३८ चा १)-कलम २ आणि अनुसूची यांद्वारे निरसित.

पाल्याधिकरणे आणि सनदी उच्च न्यायालये यांच्या अधिकारितेची व्यावृत्ती.

३. [५][[६][ जेथे या अधिनियमाचा विस्तार आहे अशा कोणत्याही राज्यातील] कोणत्याही सक्षम विधानमंडळाने, प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने] कोणत्याही पाल्याधिकरणासंबंधी यापूर्वी पारित केलेल्या

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १८८६, भाग ५ वा, पृष्ठ ७७; निवड समितीच्या अहवालासाठी पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १८९०, भाग ५ वा, पृष्ठ ७७ ; आणि कौन्सिल-मधील चर्चांच्या इतिवृत्तासाठी पहा—गॅझेट ऑफ इंडिया, १८८६, पुरवणी, पृष्ठे ४१९ व ६६६ आणि गॅझेट ऑफ इंडिया, १८९०, भाग ६ वा, पृष्ठे ३३ व ४५.

'संथाळ परगणा धारावंदी विनियम' (१८७२ चा ३)—कलम ३ याद्वारे संथाळ परगण्यात ; 'खोंडमाळ विधी विनियम, १९३६' (१९३६ चा ४)—कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे खोंडमाळ जिल्ह्यात ; आणि 'अंगुल विधी विनियम, १९३६' (१९३६ चा ५)—कलम ३ व अनुसूची यांद्वारे अंगुल जिल्ह्यात हा अधिनियम अंमलात आल्याचे घोषित करण्यात आले आहे.

हा अधिनियम गंजम व विशाखापट्टम यांमधील अनुसूचित जिल्ह्यांमध्ये अंमलात नसल्याचे, 'अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४' (१८७४ चा १४)—कलम ३(ख) खालील अधिसूचनेद्वारे घोषित करण्यात आले आहे.

या अधिनियमाचे उपबंध मद्रास राज्याच्या ज्या अंशतः अपवर्जित क्षेत्रांमध्ये अंमलात आलेले नाहीत त्या क्षेत्रांच्या भागांना 'मद्रास (अंशतः अपवर्जित क्षेत्रे) पालक आणि पाल्य विनियम, १९४०' (१९४० चा मद्रास विनियम ६) याद्वारे व वऱ्हाडला 'वऱ्हाड विधि अधिनियम, १९४१' (१९४१ चा ४) याद्वारे हा अधिनियम लागू करण्यात आला आहे.

'कोरापुट पालक आणि पाल्य विनियम, १९४३' (१९४३ चा ओरिसा विनियम ७) याद्वारे कोरापुट जिल्ह्यालादेखील हा अधिनियम आपरिवर्तनांसह लागू करण्यात आला आहे.

'पाँडिचेरी (विधि-विस्तार) अधिनियम, १९६८' (१९६८ चा २६)—पाँडिचेरी या संघराज्य क्षेत्राला हा अधिनियम पुढील परंतुकाच्या अधीनतेने लागू करण्यात आला आहे :—

"परंतु, या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट पाँडिचेरी या संघराज्य क्षेत्राच्या संत्यागींना लागू होणार नाही.".

'हिंदु अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम, १९५६' (१९५६ चा ३२)—कलम २ द्वारे या अधिनियमास पूरित केले आहे.

२. १९५१ चा अधिनियम ३—कलम ३ व अनुसूची यांद्वारे, "भाग ख राज्ये खेरीजकरून" या मजकुराऐवजी घातले.

३. 'अनुकूलन आदेश १९४८' द्वारे "ब्रिटिश बलुचिस्तानसकट" हे शब्द निरसित केले.

४. १९४९ चा अधिनियम ४०—कलम ३ व अनुसूची २ री यांद्वारे "आणि" हा शब्द वगळला.

५. 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे "गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलने किंवा गव्हर्नर किंवा लेफ्टनंट गव्हर्नर-इन-कौन्सिलने" या मजकुराऐवजी घातला.

६. १९५१ चा अधिनियम ३—कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग क राज्यांतील किंवा भाग ग राज्यांतील" या मजकुराऐवजी घातला.

किंवा यानंतर पारित केल्या जाणाऱ्या प्रत्येक अधिनियमितीच्या अधीनतेने हा अधिनियम वाचला जाईल ; आणि या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही पाल्याधिकरणाच्या अधिकारितेवर किंवा प्राधिकारावर परिणाम होतो किंवा कोणत्याही प्रकारे त्यांचे न्यूनीकरण होते किंवा [१]*** कोणत्याही उच्च न्यायालयाला असलेली कोणतीही शक्ती हिरावली जाते असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.

व्याख्या.

४. या अधिनियमात, विषय किंवा संदर्भ यामध्ये काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(१) "अज्ञान व्यक्ती" याचा अर्थ, 'भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५' (१८७५ चा ९) याच्या उपबंधांनुसार जी व्यक्ती सज्ञान झाली नाही असे मानावयाचे, ती व्यक्ती असा आहे ;

(२) "पालक" याचा अर्थ, अज्ञान व्यक्तीच्या देहाची किंवा तिच्या संपत्तीची किंवा तिचा देह व संपत्ती या दोहोंची देखभाल जिच्याकडे आहे ती व्यक्ती असा आहे ;

(३) "पाल्य" याचा अर्थ, जिच्या देहासाठी किंवा संपत्तीसाठी किंवा दोहोंसाठी एखादा पालक असतो ती अज्ञान व्यक्ती असा आहे ;

(४) "जिल्हा न्यायालय" याला 'दिवाणी प्रक्रिया संहिता' [२](१८८२ चा १४) यामध्ये त्या शब्दप्रयोगाला नेमून दिलेला अर्थ आहे, आणि स्वतःच्या साधारण अव्वल दिवाणी अधिकारितेचा वापर करणाऱ्या उच्च न्यायालयाचा त्यात समावेश आहे ;

[३][(५) "न्यायालय" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(क) एखाद्या व्यक्तीला पालक म्हणून नियुक्त किंवा घोषित करणाऱ्या आदेशासाठी या अधिनियमाखाली केलेला अर्ज विचारार्थ स्वीकारण्याची अधिकारिता असलेले जिल्हा न्यायालय ; अथवा

(ख) अशा कोणत्याही अर्जाला अनुसरून एखादा पालक नियुक्त किंवा घोषित केला गेला असेल त्याबाबतीत,—

(एक) ज्याने तो पालक नियुक्त किंवा घोषित केला असेल अथवा ज्याने तो नियुक्त किंवा घोषित केला असे या अधिनियमाखाली मानले गेले असेल ते न्यायालय किंवा त्या अधिकाऱ्याचे न्यायालय ; किंवा

(दोन) पाल्याच्या देहासंबंधीच्या कोणत्याही बाबतीत, तो पाल्य त्या त्या काळी सर्वसामान्यपणे जेथे राहात असेल अशा ठिकाणी अधिकारिता असलेले जिल्हा न्यायालय ; अथवा

(ग) कलम ४क खाली वर्ग करण्यात आलेल्या कोणत्याही कार्यवाहीसंबंधात, ज्याच्याकडे अशी कार्यवाही वर्ग करण्यात आली त्या अधिकाऱ्याचे न्यायालय ;]

(६) "जिल्हाधिकारी" याचा अर्थ, जिल्ह्याच्या महसूल प्रशासनाचा मुख्य प्रभारी अधिकारी असा आहे, आणि [४][राज्य शासन] **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ज्याची कोणत्याही स्थानिक क्षेत्रात किंवा कोणत्याही व्यक्तिवर्गाबाबत या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी त्याचा नामनिर्देश करून किंवा त्याच्या पदाधिकारपरत्वे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करील अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा त्यात समावेश आहे ;

(७)[५]* * * * * आणि—

(८) "विहित" याचा अर्थ, उच्च न्यायालयाने या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनी विहित केलेले असा आहे.

दुय्यम न्यायाधिकाऱ्यांना अधिकारिता प्रदान करण्याची आणि अशा अधिकाऱ्यांकडे कार्यवाही वर्ग करण्याची शक्ती.

[६][४क. (१) उच्च न्यायालय, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, जिल्हा न्यायालयाला दुय्यम असलेला जो कोणताही अधिकारी अव्वल दिवाणी अधिकारिता वापरत असेल त्याला या अधिनियमाच्या उपबंधांखाली अशा अधिकाऱ्याकडे वर्ग करण्यात आलेल्या, या अधिनियमाखालील कोणतीही कार्यवाही निकालात काढण्याची शक्ती प्रदान करू शकेल, अथवा कोणत्याही जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशास दुय्यम असलेल्या अशा कोणत्याही अधिकाऱ्याला ती शक्ती प्रदान करण्यासाठी त्या न्यायाधीशाला प्राधिकृत करू शकेल.

---

१. १९५१ चा अधिनियम तीन याद्वारे " भाग क राज्यांमध्ये किंवा भाग ग राज्यांमध्ये स्थापन झालेल्या " हे शब्द गाळले.

२. 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) पहा.

३. १९२६ चा अधिनियम, ४ कलम ३ द्वारे मूळ खंड (५) ऐवजी घातले.

४. 'विधी अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे 'प्रांतिक सरकार' या ऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

५. १९५१ चा अधिनियम तीन याद्वारे 'युरोपिअन ब्रिटिश प्रजाजन' याची व्याख्या गाळली.

६. १९२६ चा अधिनियम, ४ कलम ३ द्वारे घातले.

(२) जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशाला आपल्या न्यायालयात प्रलंबित असलेली या अधिनियमाखालील कोणतीही कार्यवाही कोणत्याही टप्प्याला, पोटकलम (१) खाली शक्ती प्रदान करण्यात आलेल्या आपल्या दुय्यम अधिकाऱ्याकडे निकालासाठी वर्ग करता येईल.

(३) जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशाला पोटकलम (१) खाली शक्ती प्रदान झालेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या न्यायालयात प्रलंबित असलेली या अधिनियमाखालील कोणतीही कार्यवाही कोणत्याही टप्प्याला, त्याच्या स्वत:च्या न्यायालयाकडे किंवा तशाच अन्य कोणत्याही अधिकाऱ्याकडे वर्ग करता येईल.

(४) एखादा पालक नियुक्त किंवा घोषित केला गेला असेल अशा कोणत्याही प्रकरणी, जेव्हा कोणतीही कार्यवाही या कलमाखाली वर्ग केली जाईल तेव्हा, ज्याच्याकडे ती कार्यवाही वर्ग करण्यात आली आहे त्या न्यायाधीशाचे किंवा अधिकाऱ्याचे न्यायालय हे या अधिनियमाच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनापुरते, पालक नियुक्त किंवा घोषित करणारे न्यायालय असल्याचे मानले जाईल असे जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशाला लेखी आदेशाद्वारे घोषित करता येईल.]

## प्रकरण २ रे

### पालक नियुक्त करणे आणि घोषित करणे

५. [युरोपीय ब्रिटिश प्रजाजनांच्या बाबतीत नियुक्ती करण्याची माता-वा-पिता यांची शक्ती.] 'भाग ख राज्ये (विधी) अधिनियम, १९५१' (१९५१ चा ३)-कलम ३ व अनुसूची यांद्वारे निरसित.

इतर बाबतीत नियुक्ती करण्याच्या शक्तीची व्यावृत्ती.

६. [१] * * * अज्ञान व्यक्तीच्या बाबतीत, ज्या कायद्याला ती अज्ञान व्यक्ती अधीन आहे त्यानुसार विधिग्राह्य असलेली, तिच्या देहाचा किंवा संपत्तीचा किंवा दोहोंचा पालक नियुक्त करण्याची कोणतीही शक्ती या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे काढून घेतली जाते किंवा त्यामुळे तिचे न्यूनीकरण होते असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.

पालकत्वाबाबत आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.

७. (१) अज्ञान व्यक्तीच्या कल्याणासाठी,——

(क्) तिच्या देहाचा किंवा संपत्तीचा किंवा दोहोंचा पालक नियुक्त करणारा, किंवा——

(ख्) एखाद्या व्यक्तीस अशा तऱ्हेचा पालक म्हणून घोषित करणारा,

आदेश दिला जावा याबाबत न्यायालयाची खात्री होईल तेव्हा, न्यायालय तदनुसार आदेश देऊ शकेल.

(२) जो कोणताही पालक मृत्युपत्राअन्वये किंवा अन्य संलेखाअन्वये नियुक्त केलेला नाही अथवा न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला नाही त्याला काढून टाकणे या कलमाखालील आदेशात उपलक्षित असेल.

(३) एखादा पालक हा मृत्युपत्राअन्वये किंवा अन्य संलेखाअन्वये नियुक्त केलेला असेल अथवा न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला असेल त्याबाबतीत, पूर्वोक्तानुसार नियुक्त किंवा घोषित झालेल्या पालकाच्या शक्ती या अधिनियमाच्या उपबंधांखाली संपुष्टात आल्या नाहीत तोपर्यंत अशा पालकाच्या जागी अन्य व्यक्तीला पालक म्हणून नियुक्त किंवा घोषित करणारा या कलमाखालील आदेश दिला जाणार नाही.

आदेशासाठी अर्ज करण्यास हक्कदार असलेल्या व्यक्ती.

८. (क्) अज्ञान व्यक्तीचा पालक होण्यास इच्छुक असणाऱ्या किंवा स्वत: तसा पालक असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीचा, किंवा

(ख्) अज्ञान व्यक्तीच्या कोणाही नातेवाईकाचा किंवा स्नेह्याचा, किंवा

(ग्) जेथे ती अज्ञान व्यक्ती सर्वसामान्यपणे राहात असेल किंवा जेथे तिची संपत्ती असेल त्या जिल्ह्याच्या अथवा अन्य स्थानिक क्षेत्राच्या जिल्हाधिकाऱ्याचा, किंवा

(घ्) अज्ञान व्यक्ती ज्या वर्गातील असेल त्या वर्गाबाबत प्राधिकार असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याचा, अर्ज आल्याखेरीज लगतपूर्व कलमाखाली कोणताही आदेश दिला जाणार नाही.

अर्ज विचारार्थ स्वीकारण्याची अधिकारिता असलेले न्यायालय.

९. (१) अर्ज अज्ञान व्यक्तीच्या देहाच्या पालकत्वाबाबत असेल तर, असा अर्ज जेथे अज्ञान व्यक्ती सर्वसामान्यपणे राहात असेल त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या जिल्हा न्यायालयाकडे केला जाईल.

(२) अर्ज अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीच्या पालकत्वाबाबत असेल तर, असा अर्ज एकतर अज्ञान व्यक्ती जेथे सर्वसामान्यपणे राहात असेल त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या जिल्हा न्यायालयाकडे किंवा जेथे तिची संपत्ती असेल अशा ठिकाणी अधिकारिता असलेल्या जिल्हा न्यायालयाकडे करता येईल.

---

१. १९५१ चा अधिनियम ३–कलम ३ व अनुसूची यांद्वारे "जी व्यक्ती युरोपीय ब्रिटिश प्रजाजन नाही त्या" हे शब्द गाळले.

(३) अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीच्या पालकत्वाबाबतचा अर्ज जेथे ती अज्ञान व्यक्ती सर्वसामान्यपणे राहाते त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या जिल्हा न्यायालयाहून अन्य जिल्हा न्यायालयाकडे करण्यात आल्यास जर त्या न्यायालयाच्या मते, अधिकारिता असणाऱ्या अन्य कोणत्याही जिल्हा न्यायालयाने अर्जाचा निकाल करणे अधिक न्याय्य किंवा सोईस्कर होणार असेल तर, ते न्यायालय तो अर्ज परत करू शकेल.

अर्जाचे प्ररूप.

१०. (१) अर्ज जिल्हाधिकाऱ्याने केलेला नसेल तर वादपत्र स्वाक्षरित व सत्यापित करण्यासाठी 'दिवाणी प्रक्रिया संहिता' [१] (१८८२ चा १४) यात विहित केलेल्या रीतीने स्वाक्षरित व सत्यापित केलेल्या लेखी अर्जाद्वारे अशी विनंती केली जाईल व त्या पुढील बाबी, त्या निश्चित करता येतील तेथवर निश्चित स्वरूपात नमूद केल्या जातील :—

(क्) अज्ञान व्यक्तीचे नाव, लिंग, धर्म, जन्मदिनांक आणि सर्वसामान्यपणे राहण्याचे ठिकाण ;

(ख्) अज्ञान व्यक्ती ही स्त्री असेल त्या बाबतीत, ती विवाहित आहे काय, आणि तसे असल्यास, तिच्या पतीचे नाव आणि वय ;

(ग्) अज्ञान व्यक्तीची कोणतीही संपत्ती असल्यास तिचे स्वरूप, जागा आणि अदमासे मूल्य ;

(घ्) अज्ञान व्यक्तीच्या देहाची किंवा संपत्तीची अभिरक्षा किंवा कब्जा जिच्याकडे असेल त्या व्यक्तीचे नाव आणि राहण्याचे ठिकाण ;

(ङ्) अज्ञान व्यक्तीला जवळचे नातेनाईक कोण आहेत, आणि ते कोठे राहतात ;

(च्) अज्ञान व्यक्तीच्या देहाच्या किंवा संपत्तीच्या किंवा दोहोंच्या पालकाची नियुक्ती, अज्ञान व्यक्ती ज्या कायद्यास अधीन आहे त्याअन्वये अशी नियुक्ती करण्यास हक्कदार असलेल्या किंवा आपण तसे हक्कदार असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने केली आहे काय ;

(छ्) अज्ञान व्यक्तीच्या देहाच्या किंवा संपत्तीच्या किंवा दोहोंच्या पालकत्वाबाबत त्या न्यायालयाकडे किंवा अन्य कोणत्याही न्यायालयाकडे केव्हातरी अर्ज करण्यात आला होता काय, आणि तसे असल्यास, तो कधी व कोणत्या न्यायालयाकडे केला गेला आणि त्यातून काय निष्पन्न झाले ;

(ज्) अज्ञान व्यक्तीच्या देहाचा की, संपत्तीचा की दोहोंचा पालक नियुक्त किंवा घोषित करण्यासाठी अर्ज केला आहे ;

(झ्) पालक नियुक्त करण्यासाठी अर्ज केलेला असेल त्या बाबतीत, पुरस्कृत पालकाची अर्हता ;

(ञ्) एखादी व्यक्ती पालक असल्याचे घोषित करण्यासाठी अर्ज केलेला असेल त्या बाबतीत, ती व्यक्ती कोणत्या कारणांवरून तसा दावा सांगत आहे ;

(ट्) कोणत्या कारणांमुळे अर्ज करावा लागला ;

(ठ्) विहित केला असल्यास अथवा अर्जाच्या स्वरूपामुळे नमूद करणे आवश्यक असल्यास, तसा अन्य तपशील.

(२) अर्ज जिल्हाधिकाऱ्याने केलेला असेल तर, तो न्यायालयाला उद्देशून लिहिलेल्या आणि डाकेने किंवा सोयीस्कर असल्याचे आढळून येईल अशा अन्य रीतीने पाठविण्यात आलेल्या पत्राने केला जाईल आणि, शक्य होईल तेथवर, पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेला तपशील त्यात नमूद केला जाईल.

(३) अर्जासोबत पुरस्कृत पालकाने ते कार्य करण्याची आपली इच्छा असल्याबद्दल केलेले अधिकथन असले पाहिजे आणि ते अधिकथन त्याने स्वाक्षरित केलेले व निदान दोन साक्षीदारांनी साक्षांकित केलेले असले पाहिजे.

अर्ज स्वीकृत केल्यानंतरची कार्यपद्धती.

११. (१) अर्जावरून कार्यवाही करण्यास आधार आहे अशी न्यायालयाची खात्री झाल्यास, न्यायालय त्याच्या सुनावणीसाठी एखादा दिवस निश्चित करील आणि अर्जाची व सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाबाबतची नोटीस,—

(क्) (एक) जर अज्ञान व्यक्तीचे आईबाप [२] [जेथे या अधिनियमाचा विस्तार आहे अशा कोणत्याही राज्यात] राहात असतील तर त्यांच्यावर,

(दोन) अज्ञान व्यक्तीच्या देहाची किंवा संपत्तीची अभिरक्षा किंवा कब्जा एखाद्या व्यक्तीकडे आहे असा लेखी अर्जात किंवा पत्रात जिचा नामोल्लेख केलेला असेल त्या व्यक्तीवर,

(तीन) अर्जात किंवा पत्रात पालक म्हणून नियुक्त किंवा घोषित करण्यासाठी पुरस्कृत केलेली व्यक्ती जर स्वतः अर्जदार नसेल तर तिच्यावर, आणि

---

१. आता 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) पहा.

२. १९५१ चा अधिनियम—३ कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग क राज्यात किंवा भाग ग राज्यात" या मजकुराऐवजी घातले.

(चार) अर्जाची खास नोटीस ज्या अन्य कोणत्याही व्यक्तीला द्यावी असे न्यायालयाचे मत असेल तिच्यावर,

'दिवाणी प्रक्रिया संहिता' [१](१८८२ चा १४) यामध्ये निर्देशित केलेल्या रीतीने बजावण्याची तजवीज करील; आणि

(ख्) ती न्यायगृहात व अज्ञान व्यक्तीच्या राहण्याच्या ठिकाणी एखाद्या ठळक जागी लावण्याची आणि या अधिनियमाखाली उच्च न्यायालयाने केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, स्वतःस योग्य वाटेल त्या रीतीने ती प्रकाशित करण्याची तजवीज करील.

(२) कलम-१० पोटकलम (१) खालील लेखी अर्जात वर्णन केलेल्या संपत्तीचा एखादा भाग हा जमीन असून पाल्याधिकरण तिच्या अधीक्षणाचे काम हाती घेऊ शकत असेल तर, अज्ञान व्यक्ती ज्याच्या जिल्ह्यात सर्वसामान्यपणे राहात असेल त्या जिल्हाधिकाऱ्यावर, आणि जमिनीचा एकेक भाग ज्याच्या ज्याच्या जिल्ह्यात असेल त्या प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यावरही न्यायालयाने पूर्वोक्तानुसार नोटीस बजावण्याची तजवीज करावी असे [२][राज्य शासन] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे फर्मावू शकेल, आणि त्या जिल्हाधिकाऱ्याला योग्य वाटेल अशा कोणत्याही रीतीने त्याला ती नोटीस प्रकाशित करवता येईल.

(३) पोटकलम (२) खाली बजावलेल्या किंवा प्रकाशित केलेल्या कोणत्याही नोटिशीच्या बजावणी-बद्दल किंवा प्रकाशनाबद्दल न्यायालय किंवा जिल्हाधिकारी कोणताही खर्च आकारणार नाही.

**१२.** (१) अज्ञान व्यक्तीची अभिरक्षा जिच्याकडे आहे अशी कोणी व्यक्ती असल्यास तिने न्यायालय नियत करील अशा ठिकाणी व अशा वेळी आणि अशा व्यक्तीसमोर अज्ञान व्यक्तीला हजर करावे किंवा हजर करवावे असे न्यायालय तिला निदेशित करू शकेल, आणि अज्ञान व्यक्तीच्या देहाच्या किंवा संपत्तीच्या तात्पुरत्या अभिरक्षेसाठी व संरक्षणासाठी स्वतःस योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल. पाल्याला हजर करण्यासाठी आणि देहाचे व संपत्तीचे दरम्यानच्या काळात संरक्षण करण्यासाठी अंतर्वादिक आदेश देण्याची शक्ती.

(२) जर अज्ञान व्यक्ती म्हणजे जिला लोकांसमोर येण्याची सक्ती करता कामा नये अशी स्त्री असेल तर, तिला हजर करण्यासाठी पोटकलम (१) खाली दिलेल्या निदेशात देशाच्या रूढिरिवाजानुसार तिला हजर करणे आवश्यक केले जाईल.

(३) ह्या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे—

(क्) आपण अज्ञान स्त्रीचा पती आहोत या आधारावर आपण तिचा पालक असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या अभिरक्षेत आधीच ती स्वतःच्या आईबापांच्या संमतीने आहे असे नसल्यास, न्यायालय तिला त्याच्या अभिरक्षेत ठेवण्यास, किंवा

(ख्) अज्ञान व्यक्तीच्या संपत्तीचा कब्जा जिच्याकडे असेल अशा कोणाही व्यक्तीकडून रीतसर विधिक्रम न अनुसरता अन्यथा कब्जा काढून घेण्यास, त्या संपत्तीची तात्पुरती अभिरक्षा आणि संरक्षणाचे काम जिच्याकडे सोपवलेले आहे अशी कोणतीही व्यक्ती,

प्राधिकृत होणार नाही.

**१३.** अर्जाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवशी किंवा त्यानंतर, होईल तितक्या लवकर, न्यायालय अर्जाच्या पुष्टचर्थ किंवा त्याला विरोधण्यासाठी रुजू केला जाईल असा पुरावा ऐकील. आदेश काढण्यापूर्वी पुरावा ऐकणे.

**१४.** (१) अज्ञान व्यक्तीचा पालक नियुक्त किंवा घोषित केला जाण्यासाठी करावयाच्या कार्य-वाही एकापेक्षा जास्त न्यायालयात केल्या गेल्या तर, त्यांपैकी प्रत्येक न्यायालय, त्या अन्य न्यायालयातील किंवा न्यायालयांमधील कार्यवाहींचे वृत्त विदित झाल्यावर आपल्यासमोरील कार्यवाही स्थगित करील. वेगवेगळ्या न्याया-लयांतील एकसमयाव-च्छेदी कार्यवाही.

(२) जर दोन्ही अथवा सर्व न्यायालये एकाच उच्च न्यायालयाला दुय्यम असतील तर, ती न्यायालये उच्च न्यायालयाला ते प्रकरण कळवतील आणि अज्ञान व्यक्तीचा पालक नियुक्त किंवा घोषित करण्याबाबतची कार्यवाही त्यांपैकी कोणत्या न्यायालयात व्हावी हे उच्च न्यायालय ठरवील.

[३][(३) ज्यामध्ये पोटकलम (१) खाली कार्यवाही स्थगित करण्यात आली असेल अशा अन्य कोणत्याही प्रकरणी, ती न्यायालये ते प्रकरण आपापल्या [२][राज्य शासनांना] कळवतील आणि त्यांच्याकडून जे आदेश त्यांना मिळतील ते त्यांना मार्गदर्शक ठरतील.]

**१५.** (१) अज्ञान व्यक्ती ज्या कायद्याला अधीन आहे त्यानुसार तिच्या देहाचे किंवा संपत्तीचे किंवा दोन्हींचे दोन किंवा अधिक संयुक्त पालक असू शकत असतील तर, न्यायालयाला योग्य वाटल्यास ते त्यांना त्याप्रमाणे नियुक्त किंवा घोषित करील अनेक पालक नियुक्त किंवा घोषित करणे.

[४] * * * * * *

---

१ 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) पहा.

२ 'विधि अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे 'प्रांतिक सरकार' या ऐवजी हा शब्दोलेख घातला.

३ 'अनुकूलन आदेश, १९३७' द्वारे मूळ पोटकलम (३) ऐवजी घातले.

४ १९५१ चा अधिनियम तीन-कलम ३ व अनुसूची यांद्वारे (१ एप्रिल, १९५१) पोटकलमे (२) व (३) गाळली.

(४) अज्ञान व्यक्तीच्या देहाचे आणि संपत्तीचे वेगवेगळे पालक नियुक्त किंवा घोषित करता येतील.

(५) अज्ञान व्यक्तीच्या अनेक संपत्ती असल्या तर, न्यायालयाला योग्य वाटल्यास त्याला त्या संपत्तींपैकी कोणत्याही एका किंवा अधिक संपत्तींसाठी एक वेगळा पालक नियुक्त किंवा घोषित करता येईल.

न्यायालयाच्या अधिकारिता क्षेत्राबाहेरील संपत्तीचा पालक नियुक्त किंवा घोषित करणे.

१६. न्यायालयाने जर आपल्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या पलिकडे असलेल्या कोणत्याही संपत्तीसाठी पालक नियुक्त किंवा घोषित केला तर, ती संपत्ती जेथे असेल त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या न्यायालयाकडे पालकास नियुक्त किंवा घोषित करणाऱ्या आदेशाची प्रमाणित प्रत हजर करण्यात आल्यावर, ते त्यास रीतसर नियुक्त किंवा घोषित झालेला पालक म्हणून स्वीकारील आणि त्या आदेशाची अंमलबजावणी करील.

पालक नियुक्त करताना न्यायालयाने विचारात घ्यावयाच्या बाबी.

१७. (१) अज्ञान व्यक्तीचा पालक नियुक्त किंवा घोषित करताना या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, अज्ञान व्यक्ती ज्या कायद्यास अधीन असेल त्यानुरूप त्या परिस्थितीमध्ये कोणती गोष्ट अज्ञान व्यतीला कल्याणकारक आहे हा विचार न्यायालयाला मार्गदर्शक ठरेल.

(२) कोणती गोष्ट अज्ञानव्यक्तीला कल्याणकारक ठरेल याचा विचार करताना न्यायालय अज्ञान व्यक्तीचे वय, लिंग व धर्म, पुरस्कृत पालकाचे चारित्र्य व क्षमता आणि अज्ञान व्यक्तीशी असलेल्या त्याच्या नात्याची जवळीक, मृत आई-वा-बापाची काही इच्छा असल्यास ती आणि पुरस्कृत पालकाचे अज्ञान व्यक्तीशी किंवा तिच्या संपत्तीशी असलेले सध्याचे किंवा पूर्वीचे कोणतेही संबंध लक्षात घेईल.

(३) अक्कलहूशारीने मनपसंती ठरवण्याइतपत जर अज्ञान व्यक्ती वयाने मोठी असेल तर न्यायालयास तिच्या मताचा विचार करता येईल.

[1]* * * * * *

(५) न्यायालय कोणाही व्यक्तीला तिच्या इच्छेविरुद्ध पालक म्हणून नियुक्त किंवा घोषित करणार नाही.

जिल्हाधिकाऱ्यास पदाधिकारपरत्वे नियुक्त किंवा घोषित करणे.

१८. न्यायालयाने अज्ञान व्यक्तीच्या देहाचा किंवा संपत्तीचा अथवा दोन्हींचा पालक म्हणून जिल्हाधिकाऱ्यास पदाधिकारपरत्वे नियुक्त किंवा घोषित केले असेल त्या बाबतीत, त्याला नियुक्त किंवा घोषित करणारा आदेश त्या त्या काळी तो पदाधिकार धारण करणाऱ्या व्यक्तीला अज्ञान व्यक्तीच्या देहाबाबत किंवा संपत्तीबाबत किंवा दोन्हींच्या बाबत तिचा पालक म्हणून कार्य करण्यास प्राधिकृत व आवश्यक करतो असे मानले जाईल.

विवक्षित बाबतीत न्यायालयाने पालकाची नियुक्ती करावयाची नाही.

१९. ज्या अज्ञान व्यक्तीची संपत्ती पाल्याधिकरणाच्या अधीक्षणाखाली असेल तिच्या संपत्तीचा पालक नियुक्त किंवा घोषित करण्यास, अथवा—

(क) जी अज्ञान व्यक्ती ही विवाहित स्त्री असून तिचा पती न्यायालयाच्या मते तिच्या देहाचा पालक होण्यास अपात्र नसेल तिच्या, किंवा

(ख) [2]* * * ज्या अज्ञान व्यक्तीचा बाप हयात असून न्यायालयाच्या मते त्या अज्ञान व्यक्तीच्या देहाचा पालक होण्यास तो अपात्र नसेल तिच्या, किंवा

(ग) ज्या अज्ञान व्यक्तीची संपत्ती त्या अज्ञान व्यक्तीच्या देहाचा पालक नियुक्त करण्यास सक्षम असणाऱ्या पाल्याधिकरणाच्या अधीक्षणाखाली असेल तिच्या,

देहाचा पालक नियुक्त किंवा घोषित करण्यास या प्रकरणातील कोणतीही गोष्ट न्यायालयास प्राधिकृत करणार नाही.

## प्रकरण ३ रे

### पालकांची कर्तव्ये, अधिकार आणि दायित्वे

#### सर्वसाधारण

पालकाचे पाल्याशी विश्रब्ध नाते.

२०. (१) पालकाचे आपल्या पाल्याशी विश्रब्ध नाते असलेली रचना आणि एखाद्या मृत्युपत्राने किंवा अन्य संलेखाने त्याची नियुक्ती झाली असल्यास त्याद्वारे किंवा या अधिनियमाद्वारे उपबंधित केले असेल तेवढे वगळून, त्याने आपल्या पदापासून कोणताही फायदा उठवता कामा नये.

---

१ १९५१ चा अधिनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे पोटकलम (४) गाळले.

२ कित्ता-याद्वारे "युरोपीय ब्रिटिश प्रजाजनांबाबत या अधिनियमात जे उपबंध आहेत त्यांच्या अधीनतेने," हा मजकूर गाळला.

(२) पाल्याच्या संपत्तीची पालकाने केलेली खरेदी आणि पाल्याची अज्ञानदशा संपताच किंवा त्यानंतर लवकरच पाल्याने पालकाच्या संपत्तीची केलेली खरेदी तसेच सर्वसाधारणतः पालकाचा प्रभाव त्यानंतरही टिकून असेतोपर्यंत किंवा ताजा असेतोपर्यंत त्यांच्यामध्ये झालेले सर्व संव्यवहार हे पालकाचे आपल्या पाल्याशी असलेल्या विश्रब्ध नात्याच्या कक्षेत येतात व त्यावर ते परिणाम करतात.

२१. अज्ञान व्यक्ती आपली स्वतःची पत्नी किंवा अपत्य अथवा जर ती अविभक्त हिंदू कुटुंबाची व्यवस्थापक कुटुंबीय असेल तर, त्या कुटुंबातील अन्य अज्ञान व्यक्तीची पत्नी किंवा अपत्य यांच्याखेरीज कोणत्याही अज्ञान व्यक्तीचा पालक म्हणून कार्य करण्यास अक्षम असते. पालक म्हणून कार्य करण्याची अज्ञान व्यक्तीची क्षमता.

२२. (१) न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला पालक हा आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी जी काळजी वाहील व जे कष्ट घेईल त्याबद्दल जर काही भत्ता देणे न्यायालयाला योग्य वाटले तर तो मिळण्यास तो पालक हक्कदार असेल. पालकाचे पारिश्रमिक.

(२) जेव्हा शासनाचा एखादा अधिकारी, असा अधिकारी या नात्याने पालक म्हणून नियुक्त किंवा घोषित करण्यात येईल तेव्हा, [१][राज्य शासन] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेशित करील तितकी फी अज्ञान व्यक्तींच्या संपत्तीमधून शासनाला देण्यात येईल.

२३. अज्ञान व्यक्तीच्या देहाचा किंवा संपत्तीचा किंवा दोन्हींचा पालक म्हणून न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला जिल्हाधिकारी, आपल्या पाल्याच्या पालकत्वाशी संबंधित असलेल्या सर्व बाबींमध्ये [१][राज्य शासनाच्या] किंवा ते शासन या संबंधात **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा प्राधिकरणाच्या नियंत्रणास अधीन असेल. पालक म्हणून जिल्हाधिकाऱ्याचे नियंत्रण.

## देहाचा पालक

२४. पाल्याच्या देहाच्या पालकावर पाल्याच्या अभिरक्षेचा भार टाकलेला असतो, आणि त्याने पाल्याचे पोषण, आरोग्य व शिक्षण आणि पाल्य ज्याला अधीन असेल त्या कायद्याद्वारे आवश्यक केलेल्या इतर बाबी यांच्याकडे लक्ष पुरविले पाहिजे. देहाच्या पालकाची कर्तव्ये.

२५. (१) जर पाल्याने आपल्या देहाच्या पालकाच्या अभिरक्षेत राहण्याचे सोडून दिले किंवा तीतून त्यास हलवण्यात आले तर, पाल्याने आपल्या पालकाच्या अभिरक्षेत परतणे हे त्याच्या कल्याणाचे ठरेल असे न्यायालयाचे मत असल्यास, पाल्याने परत येण्यासाठी न्यायालय आदेश देऊ शकेल आणि तो आदेश अंमलात आणण्यासाठी पाल्यास अटक करवून त्याला पालकाच्या स्वाधीन करू शकेल. अज्ञान व्यक्तीच्या अभिरक्षेवर पालकाचा हक्क.

(२) पाल्याला अटक करण्यासाठी, ते न्यायालय 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १८८२' (१८८२ चा १०) याच्या कलम १०० द्वारे प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्यास प्रदान करण्यात आलेल्या शक्ती वापरू शकेल.

(३) पाल्य हा आपला पालक नसलेल्या व्यक्तीबरोबर पालकाच्या इच्छेविरुद्ध राहिल्यास तेवढ्यानेच पालकत्व संपुष्टात येत नाही.

२६. (१) न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला देहाचा पालक हा, जिल्हाधिकारी अथवा मृत्युपत्रान्वये किंवा अन्य संलेखान्वये नियुक्त केलेला पालक नसेल तर, ज्या न्यायालयाने त्यास नियुक्त किंवा घोषित केले त्याच्या अनुज्ञेशिवाय तो पालक, विहित केली जातील ती खेरीजकरून अन्य प्रयोजनांसाठी पाल्यास त्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या सीमांबाहेर हलविणार नाही. पाल्याला अधिकारिता क्षेत्राबाहेर हलविणे.

(२) पोटकलम (१) खाली न्यायालयाने दिलेली अनुज्ञा विशेष किंवा सर्वसाधारण असू शकेल आणि अनुज्ञा देणाऱ्या आदेशाद्वारे ती निश्चित करता येईल.

## संपत्तीचा पालक

२७. पाल्याच्या संपत्तीचा पालक, सर्वसामान्य व्यवहारदृष्टीच्या मनुष्याने ती संपत्ती स्वतःची असती तर जितकी काळजीपूर्वक वहिवाटली असती तितकी काळजीपूर्वक ती वहिवाटण्यास बांधलेला असतो, आणि या प्रकरणाच्या उपबंधांच्या अधीनतेने, संपत्तीच्या प्राप्तीसाठी, संरक्षणासाठी किंवा हितासाठी ज्या कृती वाजवी व योग्य असतील त्या सर्व कृती त्यास करता येतील. संपत्तीच्या पालकाची कर्तव्ये

२८. मृत्युपत्र किंवा अन्य संलेख याद्वारे एखादा पालक नियुक्त करण्यात आला असेल त्याबाबतीत, आपल्या पाल्याच्या सत्तेची स्थावर संपत्ती गहाण ठेवण्याची किंवा प्रभारित करण्याची अथवा विक्री, दान किंवा विनिमय याद्वारे किंवा अन्यप्रकारे हस्तांतरित करण्याची त्या पालकाची शक्ती त्या निर्बंधास अधीन राहील---मात्र या अधिनियमाखाली तो पालक म्हणून घोषित झालेला असेल आणि ज्या मृत्युपत्रीय पालकाच्या शक्ती.

---

१. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे 'प्रांतिक सरकार' ऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

न्यायालयाने ती घोषणा केली त्याने तो निर्बंध असूनही लेखी आदेश काढून त्याला आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही स्थावर संपत्तीची आदेशाद्वारे परवानगी दिलेल्या पद्धतीने विल्हेवाट करण्याची परवानगी दिली असेल तर अलाहिदा.

न्यायालयाने संपत्तीचा जो पालक नियुक्त किंवा घोषित केला असेल त्याच्या शक्तींची मर्यादा.

२९. न्यायालयाने पाल्याच्या संपत्तीचा पालक म्हणून जिल्हाधिकाऱ्याहून अथवा मृत्युपत्रान्वये किंवा अन्य संलेखाअन्वये नियुक्त झालेल्या पालकाहून अन्य व्यक्तीस नियुक्त किंवा घोषित केले असेल त्याबाबतीत ती न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय––

(क्) आपल्या पाल्याच्या स्थावर संपत्तीचा कोणताही भाग गहाण ठेवणार नाही किंवा प्रभारित करणार नाही अथवा विक्री, दान किंवा विनिमय याद्वारे किंवा अन्यप्रकारे हस्तांतरित करणार नाही, किंवा

(ख्) पाच वर्षांपेक्षा जास्त मुदतीकरता अथवा ज्या दिनांकास पाल्याची अज्ञानदशा संपेल त्या दिनांकापासून एक वर्षापेक्षा अधिक असलेल्या कोणत्याही मुदतीकरता त्या संपत्तीचा कोणताही भाग भाडेपट्टयाने देणार नाही.

कलम २८ किंवा कलम २९ चे व्यतिक्रमण करुन केलेल्या हस्तांतरणांची शून्यकरणीयता.

३०. लगतपूर्वीच्या दोन कलमांपैकी कोणत्याही कलमाचे व्यतिक्रमण करुन पालकाने केलेली स्थावर संपत्तीची विल्हेवाट, तिच्यामुळे झळ पोचलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरुन शून्य-करणीय असते.

कलम २९ खालील हस्तांतरणांना परवानगी देण्याबाबतचा प्रघात.

३१. (१) अपरिहार्य असल्याखेरीज किंवा पाल्याचा उघड फायदा होणार असल्याखेरीज, कलम २९ मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणतीही कृती करण्यास न्यायालय पालकाला परवानगी देणार नाही.

(२) परवानगी देणाऱ्या आदेशातील उद्देशिकेत, प्रकरणपरत्वे, अपरिहार्यता किंवा फायदा यांचा उल्लेख केलेला असेल, तसेच ज्या संपत्तीबाबत परवानगी देण्यात आलेली कृती करण्यात येणार आहे त्या संपत्तीचे वर्णन असेल आणि परवानगीसोबत काही शर्ती जोडणे न्यायालयाला योग्य वाटल्यास तशा शर्ती विनिर्दिष्ट केल्या जातील आणि त्या न्यायालयाचा न्यायाधीश स्वहस्ते तो आदेश लिहून काढील व त्यावर दिनांक घालून स्वाक्षरी करील, अथवा जेव्हा स्वतःच्या हाताने आदेश लिहून काढणे काही कारणामुळे त्याला शक्य नसेल तेव्हा, त्याने सांगितल्याबरहुकूम तो आदेश उतरुन घेतला जाईल आणि तो न्यायाधीश त्यावर दिनांक घालून स्वाक्षरी करील.

(३) परवानगीसोबत इतर शर्तींबरोबरच न्यायालयाला स्वविवेकानुसार पुढील शर्ती जोडता येतील, त्या अशा––

(क्) न्यायालयाच्या मंजुरीशिवाय विक्री पूर्ण करण्यात येऊ नये;

(ख्) उच्च न्यायालयाने या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने न्यायालय निदेशित करील त्याप्रमाणे नियोजित विक्रीच्या जाहीरनाम्यानंतर, न्यायालयाने विनिर्दिष्ट करावयाच्या वेळी व ठिकाणी, न्यायालयासमोर किंवा न्यायालयाने खास त्या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या एखाद्या व्यक्तीसमोर, जाहीर लिलावाद्वारे सर्वाधिक बोली बोलणाऱ्याला विक्री केली गेली पाहिजे;

(ग्) भाडेपट्टा अधिमूल्याच्या प्रतिफलार्थ केला जाऊ नये किंवा न्यायालय निदेशित करील इतक्या वर्षांच्या मुदतीसाठी आणि अशा भाड्याने व अशा ठरावांच्या अधीनतेने केला गेला पाहिजे;

(घ्) परवानगी दिलेल्या कृतीपासून मिळणारे संपूर्ण उत्पन्न किंवा त्याचा कोणताही भाग पालकाने त्या न्यायालयात अशासाठी भरला पाहिजे की, जेणेकरुन त्यातून न्यायालयाला विहित रोख्यांचा खर्च भागवता येईल किंवा त्यामध्ये ते गुंतवता येईल अथवा न्यायालय निदेश देईल त्याप्रमाणे अन्यप्रकारे त्याची विल्हेवाट करता येईल.

(४) कलम २९ मध्ये उल्लेखिलेली कृती करण्यासाठी पालकाला परवानगी देण्यापूर्वी पाल्याच्या ज्या कोणा नातेवाईकाला किंवा स्नेह्याला अर्जाची नोटीस मिळावयास पाहिजे असे न्यायालयाचे मत असेल त्याला न्यायालय त्याची नोटीस काढवू शकेल आणि अशा अर्जाला विरोधण्यासाठी कोणी व्यक्ती उपस्थित झाली तर न्यायालय तिचे कथन ऐकून घेईल व ते नोंदून घेईल.

न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेल्या संपत्तीच्या पालकाच्या शक्तीं-मध्ये फेरफार करणे.

३२. न्यायालयाने पाल्याच्या संपत्तीचा पालक नियुक्त किंवा घोषित केला असून, असा पालक हा जिल्हाधिकारी नसेल त्या बाबतीत, जे पाल्याच्या फायद्याचे आहे आणि पाल्य ज्या कायद्याला अधीन आहे त्याच्याशी सुसंगत आहे असे स्वतःला वाटेल तशा रीतीने व तशा मर्यादेपर्यंत न्यायालयास पाल्याच्या संपत्तीबाबत पालकाला असलेल्या शक्ती वेळोवेळी निश्चित करता येतील, त्यांवर निर्बंध घालता येतील किंवा त्यांची व्याप्ती वाढवता येईल.

**अशा तऱ्हेने नियुक्त किंवा घोषित झालेल्या पालकाचा, पाल्याच्या संपत्तीच्या व्यवस्थापनाच्या संबंधात न्यायालयाला आपले मत देण्याची विनंती करण्याचा अधिकार.**

३३. (१) न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेल्या पालकास, त्याला नियुक्त किंवा घोषित करणाऱ्या न्यायालयाकडे आपल्या पाल्याच्या संपत्तीचे व्यवस्थापन किंवा प्रशासन यासंबंधात उपस्थित झालेल्या कोणत्याही प्रश्नावर न्यायालयाचे मत, सल्ला किंवा निदेश मिळवण्यासाठी त्याला लेखी अर्जाद्वारे विनंती करता येईल.

(२) जर न्यायालयास, तो प्रश्न संक्षेपतः निकालात काढण्याजोगा आहे असे वाटले तर, अर्जात ज्यांचा हितसंबंध आहे अशांपैकी ज्या व्यक्ती न्यायालयास योग्य वाटतील त्या व्यक्तींवर न्यायालय त्या लेखी अर्जाची एक प्रत बजावण्याची तजवीज करील आणि त्या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी त्या व्यक्तींना समक्ष हजर राहता येईल.

(३) लेखी अर्जात वस्तुस्थिती प्रामाणिकपणे मांडणाऱ्या आणि न्यायालयाने दिलेला सल्ला किंवा निदेश यानुसार कृती करणाऱ्या पालकाने त्याच्या स्वतःच्या जबाबदारीपुरते अर्जाच्या विषयासंबंधी पालक म्हणून आपले कर्तव्य पार पाडले असल्याचे मानले जाईल.

**संपत्तीचा जो पालक न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला असेल त्याच्यावरील आबंधने.**

३४. न्यायालयाने पाल्याच्या संपत्तीचा पालक नियुक्त किंवा घोषित केलेला असून असा पालक हा जिल्हाधिकारी नसेल त्या बाबतीत, त्या पालकाला :––

(क) न्यायालयाने तसे आवश्यक केल्यास तत्कालीन न्यायाधीशाच्या उपयोगासाठी, पाल्याच्या संपत्तीबाबत आपणास जे काही मिळेल त्याचा रीतसर हिशेब देण्यासाठी स्वतःला बांधून घेणारे असे व विहित केले जाईल त्याप्रमाणे जामीनदारांसहित किंवा त्यांच्या विना असे बंधपत्र शक्य होईल तितके विहित नमुन्यानुसार करून द्यावे लागेल ;

(ख) न्यायालयाने तसे आवश्यक केल्यास, न्यायालयाने पालकास नियुक्त किंवा घोषित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत किंवा न्यायालय निदेशित करील अशा अन्य मुदतीच्या आत न्यायालयाकडे एक विवरणपत्र सुपूर्द करावे लागेल व त्यात पाल्याच्या मालकीच्या स्थावर संपत्तीचे व तसेच, विवरणपत्र सादर करण्याच्या दिनांकापर्यंत पाल्याच्या वतीने स्वतःला मिळालेले पैसे व अन्य जंगम संपत्ती आणि त्या दिनांकास पाल्याप्रत किंवा त्याच्याकडून देय असलेली ऋणे यांचे विवरण असेल ;

(ग) न्यायालयाने तसे आवश्यक केल्यास, न्यायालय वेळोवेळी निदेशित करील अशावेळी आणि अशा नमुन्यानुसार न्यायालयात आपले हिशेब सादर करावे लागतील ;

(घ) न्यायालयाने तसे आवश्यक केल्यास, त्या हिशेबांप्रमाणे स्वतःकडून देय असलेली बाकी रक्कम किंवा त्यापैकी न्यायालय निदेशित करील इतकी रक्कम न्यायालय निदेशित करील अशा वेळी न्यायालयात भरावी लागेल ; आणि

(ङ) पाल्याचा किंवा त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींचा निर्वाह, शिक्षण व विकास यांसाठी, आणि पाल्याचे किंवा त्या व्यक्तींपैकी कोणाचेही जर काही संस्कार समारंभ झाले तर ते साजरे करण्यासाठी, पाल्याच्या संपत्तीच्या उत्पन्नातून न्यायालय वेळोवेळी निदेशित करील इतका अंश अथवा न्यायालयाने तसा निदेश दिल्यास, ती सर्व संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग उपयोजित करावा लागेल.

**हिशेब तपासण्यासाठी पारिश्रमिक देवविण्याची शक्ती.**

[1][३४क. कलम ३४ च्या खंड (ग) खाली किंवा अन्यथा आज्ञा करण्यात आल्यावरून जेव्हा पाल्याच्या संपत्तीचा पालक आपले हिशेब सादर करील तेव्हा, न्यायालय ते हिशेब तपासण्यासाठी एखादी व्यक्ती नियुक्त करू शकेल आणि त्या कामाबद्दलचे पारिश्रमिक संपत्तीच्या उत्पन्नामधून दिले जावे असा निदेश देऊ शकेल.]

**प्रशासन बंधपत्र घेतलेले असेल त्या बाबतीत पालकाविरुद्ध दावा.**

३५. न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेल्या पालकाने आपल्या पाल्याच्या संपत्तीबाबत आपणास जे काही मिळेल त्याचा रीतसर हिशेब देण्यासाठी बंधपत्र करून दिलेले असेल त्या बाबतीत, न्यायालयाकडे लेखी अर्जाने विनंती करण्यात आल्यावर आणि बंधपत्रातील वचनबंधन पाळले गेलेले नाही अशी आपली खात्री झाल्यावर आणि न्यायालयाला योग्य वाटतील अशा ज्या अटी प्रतिभूतीविषयक असतील अथवा मिळालेले कोणतेही पैसे न्यायालयात भरावेत असा किंवा अन्यथा उपबंध करीत असतील त्या अटींवर न्यायालय ते बंधपत्र अन्य एखाद्या व्यक्तीस अभिहस्तांकित करू शकेल आणि तदनंतर जणू काही ते बंधपत्र मुळात न्यायालयाच्या त्या न्यायाधीशाऐवजी त्या व्यक्तीला करून दिलेले असावे त्याप्रमाणे ती व्यक्ती स्वतःच्या नावाने त्या बंधपत्रावरून दावा लावण्यास हक्कदार होईल, व त्या बंधपत्राच्या कोणत्याही प्रकारच्या भंगाबाबत पाल्याचा विश्वस्त म्हणून त्याच्या आधारे वसुली करण्यास हक्कदार होईल.

**प्रशासन बंधपत्र घेतलेले नसेल त्या बाबतीत पालकाविरुद्ध दावा.**

३६. (१) न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेल्या पालकाने पूर्वोक्तानुसार बंधपत्र दिलेले नसेल त्या बाबतीत, पाल्याच्या संपत्तीबाबत पालकाला जे काही मिळाले त्याचा हिशेब मागण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला पाल्याची अज्ञानदशा चालू असताना कोणत्याहीवेळी न्यायालयाच्या अनुज्ञेने इष्टमित्र म्हणून आणि पूर्वोक्त अशा अटींवर पालकाच्याविरुद्ध किंवा तो मयत असल्यास त्याच्या प्रतिनिधी-

---

१. १९२९ चा अधिनियम १७-कलम २ द्वारे घातले.

विरुद्ध दावा मांडता येईल आणि पालकाकडून किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या प्रतिनिधीकडून प्रदेय असल्याचे ठरेल अशी रक्कम तिला त्या दाव्यात पाल्याचा विश्वस्त म्हणून वसूल करता येईल.

(२) पोटकलम (१) चे उपबंध पालकाच्या विरुद्ध असलेल्या दाव्याशी संबंधित आहेत तेथवर, 'दिवाणी प्रक्रिया संहिता' [१](१८८२ चा १४) याच्या कलम ४४० चे उपबंध या अधिनियमाने जसे विशोधित केले तशा उपबंधांना अधीन असतील.

विश्वस्त म्हणून पालकाचे सर्वसाधारण दायित्व.

३७. अन्य कोणत्याही लाभाधिकारीला किंवा त्याच्या प्रतिनिधीला आपल्या विश्वस्ताविरुद्ध किंवा त्या विश्वस्ताच्या प्रतिनिधीविरुद्ध जो कोणताही उपाय योजण्याचा मार्ग उपलब्ध असेल तो पाल्याला किंवा त्याच्या प्रतिनिधीला आपल्या पालकाविरुद्ध किंवा त्याच्या प्रतिनिधीविरुद्ध उपलब्ध होण्याबाबत लगतपूर्वीच्या दोन्हीं कलमांमध्ये स्पष्टपणे उपबंध केलेला नसला तरी, जेणेकरून त्या उपायांपासून तो वंचित होईल अशाप्रकारे त्यांपैकी कोणत्याही कलमातील कोणत्याही गोष्टीचा अर्थ लावला जाणार नाही.

### पालकत्वाची समाप्ती

संयुक्त पालकांमध्ये उत्तरजीवित्वाचा अधिकार.

३८. दोन किंवा अधिक संयुक्त पालकांपैकी एकाचा मृत्यू झाल्यास न्यायालय पुढील नियुक्ती करीपर्यंत उत्तरजीवी व्यक्तीकडे किंवा व्यक्तींकडे पालकत्व चालू राहते.

पालकाला काढून टाकणे.

३९. न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेल्या पालकास अथवा मृत्युपत्रान्वये किंवा अन्य संलेखाअन्वये नियुक्त झालेल्या पालकास न्यायालय हितसंबंधित व्यक्तीच्या अर्जावरून किंवा स्वत: होऊन पुढीलपैकी कोणत्याही कारणावरून काढून टाकू शकेल, ती अशी :—

(क) आपल्यावरील विश्वासाचा दुरुपयोग केल्याबद्दल;

(ख) आपली विश्वासमूलक कर्तव्ये करण्याच्या बाबतीत सतत कसूर केल्याबद्दल;

(ग) आपली विश्वासमूलक कर्तव्ये करण्याची अक्षमता असल्याबद्दल;

(घ) आपल्या पाल्याला वाईट वागणूक दिल्याबद्दल, किंवा त्याची योग्य काळजी घेण्याबाबत उपेक्षा केल्याबद्दल;

(ङ) या अधिनियमातील कोणत्याही उपबंधाचा किंवा त्या न्यायालयाच्या कोणत्याही आदेशाचा बिनदिक्कतपणे अनादर केल्याबद्दल;

(च) जो गुन्हा घडल्यावरून न्यायालयाच्या मते पालकास पाल्याचा पालक होण्यास अपात्र करणारा चारित्र्यदोष उपलक्षित होतो त्या गुन्ह्याबाबत दोषी ठरल्याबद्दल;

(छ) आपली कर्तव्ये इमानदारीने पार पाडण्याच्या विरोधी हितसंबंध असल्याबद्दल;

(ज) न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आतील रहिवास संपुष्टात आल्याबद्दल;

(झ) संपत्तीच्या पालकाच्या बाबतीत, तो दिवाळखोर किंवा नादार झाल्याबद्दल;

(ञ) अज्ञान व्यक्ती ज्या कायद्यास अधीन असेल त्याखाली पालकाचे पालकत्व संपुष्टात आल्याबद्दल, किंवा

संपुष्टात येण्यास पात्र असल्यामुळे :

परंतु, मृत्युपत्रान्वये किंवा अन्य संलेखाअन्वये नियुक्त झालेला पालक या अधिनियमाखाली घोषित केलेला असो वा नसो,—

(क) जर त्याची नियुक्ती करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर खंड (छ) मध्ये उल्लेखिलेला विरोधी हितसंबंध उपार्जित झाला आहे किंवा तो विरोधी हितसंबंध अस्तित्वात असल्याचे माहीत नसताना त्या व्यक्तीने नियुक्ती केली व ती चालू ठेवली असे दाखवून देण्यात आले आहे असे घडल्याशिवाय त्या खंडात उल्लेखिलेल्या कारणावरून, किंवा

(ख) ज्यामुळे पालकाची कार्ये पार पाडणे त्यास न्यायालयाच्या मते दुष्कर आहे अशा ठिकाणी असा पालक राहू लागला आहे असे घडल्याशिवाय,

त्याला काढून टाकले जाणार नाही.

पालकाची कार्यमुक्तता.

४०. (१) न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेल्या पालकास आपल्या कार्यपदाचा राजीनामा देण्याची इच्छा असल्यास, त्याला, आपणास कार्यमुक्त केले जावे यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

(२) त्या अर्जास पुरेसे कारण आहे असे न्यायालयास आढळून आले तर, ते त्या पालकास कार्यमुक्त करील आणि अर्ज करणारा पालक हा जिल्हाधिकारी असून स्वत:ला कार्यमुक्त केले जाण्यासाठी त्याने अर्ज करण्याला [२][राज्य शासनाने] मान्यता दिली असेल तर, न्यायालय त्यास कोणत्याही परिस्थितीत कार्यमुक्त करील.

---

१. आता 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याच्या पहिल्या अनुसूचीतील ऑर्डर ३२ वी-नियम १ व ४ (२) पहा.

२. 'विधी अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे 'प्रांतिक सरकार' या ऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

४१. (१) देहाच्या पालकाच्या शक्ती-- पालकाचा प्राधिकार संपुष्टात येणे.

(क) त्याचा मृत्यू झाल्यामुळे, त्यास काढून टाकण्यात आल्यामुळे किंवा त्यास कार्यमुक्त करण्यात आल्यामुळे;

(ख) पाल्याच्या देहाच्या अधीक्षणाचे काम पाल्याधिकरणाने पत्करल्यामुळे;

(ग) पाल्याची अज्ञानदशा संपल्यामुळे;

(घ) स्त्री-पाल्याच्या बाबतीत, तिच्या देहाचा पालक होण्यास अपात्र नसलेल्या पतीशी तिचे लग्न झाल्यामुळे किंवा पालक हा न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला असेल तर, न्यायालयाच्या मते त्याप्रमाणे अपात्र नसलेल्या पतीशी तिचे लग्न झाल्यामुळे; किंवा

(ङ) ज्या पाल्याच्या देहाचा पालक होण्यास त्याचा बाप अपात्र होता त्या पाल्याच्या बाबतीत, बापाची अपात्रता संपल्यामुळे, किंवा न्यायालयाने तो तसा अपात्र असल्याचे मानलेले असेल त्या बाबतीत, न्यायालयाच्या मते त्याची ती अपात्रता संपल्यामुळे,

संपुष्टात येतात.

(२) संपत्तीच्या पालकाच्या शक्ती--

(क) त्याचा मृत्यू झाल्यामुळे, त्यास काढून टाकण्यात आल्यामुळे किंवा त्यास कार्यमुक्त करण्यात आल्यामुळे;

(ख) पाल्याच्या संपत्तीच्या अधीक्षणाचे काम पाल्याधिकरणाने पत्करल्यामुळे; किंवा

(ग) पाल्याची अज्ञानदशा संपल्यामुळे;

संपुष्टात येतात.

(३) जेव्हा कोणत्याही कारणामुळे पालकाच्या शक्ती संपुष्टात येतील तेव्हा, न्यायालय निदेशित करील त्याप्रमाणे आपल्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेली पाल्याची कोणतीही संपत्ती अथवा आपल्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेले पाल्याच्या भूतपूर्व किंवा विद्यमान संपत्तीचे हिशेब न्यायालय निदेशित करील त्याप्रमाणे सुपूर्द करण्यास न्यायालय त्या पालकाला किंवा तो मृत असल्यास त्याच्या प्रतिनिधीला आवश्यक करू शकेल.

(४) जेव्हा न्यायालयाने आवश्यक केल्याप्रमाणे त्याने संपत्ती किंवा हिशेब सुपूर्द केले असतील तेव्हा, मागाहून उघडकीस येईल अशा कोणत्याही कपटकृत्याबद्दलचे दायित्व वगळता, तो त्याच्या दायित्वांतून मुक्त झाला असल्याचे न्यायालय घोषित करू शकेल.

४२. जेव्हा न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेल्या पालकास कार्यमुक्त करण्यात आले असेल अथवा पाल्य ज्या कायद्यास अधीन आहे त्या कायद्याखाली पालक कार्य करण्यास हक्कदार राहिला नसेल अथवा अशा कोणाही पालकास किंवा मृत्युपत्राअन्वये अगर अन्य संलेखाअन्वये नियुक्त झालेल्या पालकास काढून टाकण्यात आले असेल किंवा तो मृत्यू पावला असेल तेव्हा, पाल्य त्यावेळी अज्ञानच असल्यास न्यायालयाला स्वतः होऊन किंवा २ ऱ्या प्रकरणाखाली आलेल्या अर्जावरून, प्रकरणपरत्वे, त्याच्या देहाचा किंवा संपत्तीचा किंवा दोन्हींचा दुसरा पालक नियुक्त किंवा घोषित करता येईल. मृत, कार्यमुक्त किंवा काढून टाकलेल्या पालकाच्या उत्तराधिकाऱ्याची नियुक्ती.

## प्रकरण ४ थे

### पूरक उपबंध

४३. (१) कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीच्या अर्जावरून, किंवा स्वतः होऊन न्यायालय त्याने नियुक्त किंवा घोषित केलेल्या पालकाचे वर्तन किंवा कामकाज विनियमित करणारा आदेश काढू शकेल. पालकाचे वर्तन किंवा कामकाज यांचे विनियमन करणारे आदेश व त्या आदेशांची बजावणी.

(२) जर पाल्याचे एकाहून अधिक पालक असतील आणि त्याच्या कल्याणाविषयीच्या प्रश्नाबाबत त्यांचे मतैक्य होऊ शकले नाही तर, त्यांच्यापैकी कोणालाही न्यायालयाकडे त्याचा निदेश मिळवण्यासाठी अर्ज करता येईल आणि ते न्यायालय मतभेदाच्या बाबींसंबंधी आपणास योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली द्यावयाच्या आदेशाचे उद्दिष्ट विलंबामुळे विफल होईल असे ज्याबाबतीत दिसून येईल तेवढी बाब खेरीजकरून एरव्ही, आदेश काढण्यापूर्वी न्यायालय त्यासाठी आलेल्या अर्जाची किंवा, प्रकरणपरत्वे, तो आदेश काढण्याचा आपला विचार असल्याची नोटीस पोटकलम (१) खालील बाबतीत पालकास किंवा पोटकलम (२) खालील बाबतीत अर्ज न करणाऱ्या पालकास देण्याबाबत निदेश देईल.

(४) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली दिलेल्या आदेशाची अवज्ञा केली गेली तर, पोटकलम (१) खालील बाबतीत, जणु तो पाल्य हा वादी व पालक हा प्रतिवादी असावा त्याप्रमाणे आणि पोटकलम (२) खालील बाबतीत, जणू अर्ज करणारा पालक हा वादी व दुसरा पालक हा

प्रतिवादी असावा त्याप्रमाणे 'दिवाणी प्रक्रिया संहिता' [१](१८८२ चा १४) हिचे कलम ४९२ किंवा कलम ४९३ याखाली दिलेल्या व्यादेशाच्याच पद्धतीने त्या आदेशाची अंमलबजावणी करता येईल.

(५) पोटकलम (२) खालील बाब खेरीजकरून एरव्ही, जो जिल्हाधिकारी त्या नात्याने पालक असेल त्याला या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

पाल्यास अधिकारिता क्षेत्रातून दूर हलविण्याबद्दल दंड.

४४. न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेल्या पालकाने न्यायालयाला पाल्याबाबतचा आपला प्राधिकार बजावण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी किंवा परिणामत: त्याकामी त्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने, कलम २५ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करून पाल्यास न्यायालयाच्या अधिकारितेच्या सीमांतून दूर हलविले तर, तो पालक न्यायालयाच्या आदेशानुसार जास्तीत जास्त एक हजार रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास, किंवा सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतका काळ दिवाणी तुरुंगातील कारावासास पात्र होईल.

आज्ञाभंगाबद्दल दंड.

४५. (१) पुढील बाबतींत म्हणजे—

(क) अज्ञान व्यक्तीची अभिरक्षा जिच्याकडे असेल ती व्यक्ती जर कलम १२-पोटकलम (१) खालील निदेशाला अनुसरून त्या अज्ञान व्यक्तीला हजर करण्यास किंवा हजर करवण्यास अथवा कलम २५-पोटकलम (१) खालील आदेशाचे पालन म्हणून अज्ञान व्यक्तीला पालकाच्या अभिरक्षेत परतण्यास भाग पाडण्यासाठी आपली शिकस्त करण्यास चुकली तर; किंवा

(ख) न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला पालक जर कलम ३४–खंड (ख) खाली आवश्यक केलेले विवरणपत्र त्या खंडाद्वारे किंवा त्याखाली देण्यात आलेल्या मुदतीत सुपूर्द करण्यास अथवा त्या कलमाच्या पोटकलम (ग) खाली केलेल्या आज्ञेला अनुसरून हिशेब सादर करण्यास अथवा त्या कलमाच्या पोटकलम (घ) खाली केलेल्या आज्ञेला अनुसरून त्या हिशेबाप्रमाणे त्याचे-कडून देय असलेली बाकी न्यायालयात भरण्यास चुकला तर; किंवा

(ग) जी व्यक्ती पालक राहिलेली नाही ती किंवा तिचा प्रतिनिधी जर कलम ४१–पोटकलम (१) खाली केलेल्या आज्ञेला अनुसरून कोणतीही संपत्ती किंवा हिशेब सुपूर्द करण्यास चुकली तर,

ती व्यक्ती, तो पालक किंवा, प्रकरणपरत्वे, तो प्रतिनिधी न्यायालयाच्या आदेशानुसार जास्तीत जास्त शंभर रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास, आणि तो न जुमानल्यास ज्या कालावधीत कसूर चालू राहील, त्यापैकी पहिल्या दिवसानंतरच्या प्रत्येक दिवसामागे जास्तीत जास्त दहा रुपयांपर्यंतच्या आणि एकूण पाचशे रुपयांहून अधिक नाही इतक्या द्रव्यदंडास पात्र होईल आणि, प्रकरणपरत्वे, अज्ञान व्यक्तीला हजर करण्याचे किंवा तिला हजर करविण्याचे किंवा तिला परतण्यास भाग पाडण्याचे किंवा विवरणपत्र सुपूर्द करण्याचे किंवा हिशेब सादर करण्याचे किंवा बाकी रकमेचा भरणा करण्याचे किंवा संपत्ती अगर हिशेब सुपूर्द करण्याचे तो अभिवचन देत नाही तोपर्यंत दिवाणी तुरुंगात स्थानबद्ध होण्यास पात्र होईल.

(२) पोटकलम (१) खाली अभिवचन दिल्यावर स्थानबद्धतेतून मुक्त झालेली व्यक्ती जर न्याया-लयाने दिलेल्या मुदतीत ते अभिवचन पुरे करण्यास चुकली तर, न्यायालय तिला अटक करवून पुन्हा दिवाणी तुरुंगात पाठवू शकेल.

जिल्हाधिकारी व दुय्यम न्यायालये यांचे अहवाल.

४६. (१) न्यायालय जिल्हाधिकाऱ्यास किंवा त्या न्यायालयाप्रत दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयास या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीतून उद्भवणाऱ्या बाबीवर अहवाल देण्यास फर्मावू शकेल आणि तो अहवाल त्यास पुरावा म्हणून समजून चालता येईल.

(२) तो अहवाल तयार करण्यासाठी जिल्हाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे, दुय्यम न्यायालयाचा न्यायाधीश त्यास जरूर वाटेल अशी चौकशी करील आणि साक्ष देण्यासाठी किंवा दस्तऐवज हजर करण्या-साठी साक्षीदाराला समक्ष हजर राहण्यास भाग पाडण्याची जी कोणतीही शक्ती 'दिवाणी प्रक्रिया संहिता' [१](१८८२ चा १४) याद्वारे न्यायालयाला प्रदान करण्यात आलेली असेल ती शक्ती त्यांना चौकशीच्या कामी वापरता येईल.

अपीलपात्र आदेश.

४७. (क) कलम ७ खाली, पालकास नियुक्त किंवा घोषित करणारा अथवा नियुक्त किंवा घोषित करण्यास नकार देणारा; किंवा

(ख) कलम ९–पोटकलम (३) खाली अर्ज परत करणारा; किंवा

(ग) कलम २५ खाली पाल्यास त्याच्या पालकाच्या अभिरक्षेत परत पाठविण्यास फर्मावणारा किंवा तसे करण्यास नकार देणारा; किंवा

---

१. आता 'दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८' (१९०८ चा ५) याच्या पहिल्या अनुसूचीतील ऑर्डर ३९ वी-नियम १ व २ पहा.

(घ्) कलम २६ खाली न्यायालयाच्या अधिकारिता क्षेत्राच्या सीमांतून पाल्यास दूर हलविण्याची परवानगी नाकारणारा किंवा त्याबाबत शर्ती लादणारा; किंवा

(ङ्) कलम २८ किंवा कलम २९ खाली त्या कलमात निर्देशिलेली कृती करण्यास पालकाला परवानगी नाकारणारा; किंवा

(च्) कलम ३२ खाली पालकाच्या शक्ती निश्चित करणारा, त्यांवर निर्बंध घालणारा किंवा त्यांची व्याप्ती वाढवणारा; किंवा

(छ्) कलम ३९ खाली पालकाला काढून टाकणारा; किंवा

(ज्) कलम ४० खाली पालकास कार्यमुक्त करण्यास नकार देणारा ; किंवा

(झ्) कलम ४३ खाली पालकाच्या वर्तनाचे किंवा कामकाजाचे विनियमन करणारा किंवा पालकां-मधील मतभेदाच्या बाबींचा निर्णय करणारा किंवा आदेशाची अंमलबजावणी करणारा; किंवा

(ञ्) कलम ४४ किंवा कलम ४५ खाली दंड लादणारा;

असा जो आदेश [१]* * * न्यायालयाने काढला असेल त्यावर उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

४८. लगतपूर्व कलमान्वये आणि 'दिवाणी प्रक्रिया संहिता' [२](१८८२ चा १४) यातील ६२२ व्या कलमान्वये जे उपबंधित केलेले असेल तेवढे वगळून, या अधिनियमाखाली काढलेला आदेश अंतिम असेल, आणि दावा आणून किंवा अन्य प्रकारे हरकत घेतली जाण्यास तो पात्र असणार नाही. इतर आदेशांची अंतिमता.

४९. या कलमाखालील कोणत्याही कार्यवाहीसंबंधात पालक किंवा अन्य व्यक्ती दिवाणी तुरुंगात असताना तिचा निर्वाह चालवण्याचा खर्च धरून येणारा खर्च, या अधिनियमाखाली उच्च न्यायालयाने केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, कार्यवाही चालू असलेल्या न्यायालयाच्या विवेकाधीन राहील. दावाखर्च.

५०. (१) नियम करण्याची अन्य कोणतीही शक्ती या अधिनियमाद्वारे स्पष्टपणे किंवा उपलक्षणेने प्रदान करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, उच्च न्यायालयास पुढील गोष्टींबाबत या अधिनियमाशी सुसंगत असे नियम वेळोवेळी करता येतील :— उच्च न्यायालयाची नियम करण्याची शक्ती.

(क्) जिल्हाधिकारी व दुय्यम न्यायालये यांजकडून कोणत्या बाबीसंबंधी व कोणत्या वेळी अहवाल मागवावेत याविषयी ;

(ख्) पालकांस द्यावयाचे भत्ते व त्यांचेकडून मागवावयाची प्रतिभूती याविषयी आणि कोणत्याबाबतीत असे भत्ते द्यावेत त्याविषयी ;

(ग्) कलमे २८ व २९ मध्ये निर्देशिलेल्या कृती करण्याच्या परवानगीसाठी पालकांच्या अर्जाबाबत अनुसरावयाच्या कार्यपद्धतीविषयी ;

(घ्) कलम ३४ चे खंड (क्), (ख्), (ग्) व (घ्) यांमध्ये उल्लेखिलेल्या अशा आज्ञा कोणत्या परिस्थितीत द्यावयाच्या याविषयी ;

(ङ्) पालकांनी सादर केलेली विवरणपत्रे व सादर केलेले हिशेब जतन करण्याविषयी ;

(च्) हितसंबंधित व्यक्तीने ती विवरणपत्रे व ते हिशेब यांचे निरीक्षण करण्याविषयी ;

[३][(च्च्) कलम ३४ क खालील हिशेब-तपासणी, ती करण्यासाठी कोणत्या वर्गातील व्यक्ती नियुक्त करावयाच्या आणि त्यांना किती प्रमाणात पारिश्रमिक मंजूर करावयाचे त्याविषयी;]

(छ्) पाल्यांच्या सत्तेचा पैसा आणि त्यांच्या पैशांबद्दलचे रोखे यांच्या अभिरक्षेविषयी ;

(ज्) पाल्यांच्या सत्तेचा पैसा कोणत्या रोख्यांमध्ये गुंतवता येईल त्याविषयी ;

(झ्) ज्यांच्याकरता जिल्हाधिकाऱ्यांहून अन्य पालक न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केले असतील त्या पाल्यांच्या शिक्षणाविषयी;

(ञ्) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी न्यायालयांना सर्वसाधारणपणे मार्गदर्शन करण्याविषयी.

---

१. १९२६ चा अधिनियम, ४-कलम ४ द्वारे "जिल्हा" हा शब्द गाळला.

२. आता 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याचे कलम ११५ पहा.

३. १९२९ चा अधिनियम १७-कलम ३ द्वारे घातले.

(२) पोटकलम (१) मधील (क्) व (झ्) या खंडांखालील नियमांना [1][राज्य शासन] मान्यता देईपर्यंत ते परिणामक होणार नाहीत, तसेच या कलमाखालील कोणताही नियम शासकीय राजपत्रात तो प्रकाशित केला जाईपर्यंत परिणामक होणार नाही.

**न्यायालयाने अगोदरच नियुक्त केलेल्या पालकांना ह्या अधिनियम लागू असणे.**

५१. या अधिनियमाने निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमितीखाली दिवाणी न्यायालयाने नियुक्त केलेला किंवा त्याजकडून मिळालेले प्रशासन प्रमाणपत्र धारण करणारा पालक, विहित केली जाईल तेवढी बाब खेरीजकरून एरव्ही, जणू काही तो २ऱ्या प्रकरणाखाली न्यायालयाने नियुक्त किंवा घोषित केलेला असावा त्याप्रमाणे या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या उपबंधांस अधीन असेल.

५२. [निरसित.] 'निरसन अधिनियम, १९३८' (१९३८ चा १)-कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

५३. [निरसित.] 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५)-कलम १५६ व अनुसूची पाचद्वारे निरसित.

अनुसूची. [निरसित.] 'निरसन अधिनियम, १९३८' (१९३८ चा १)-कलम २ व अनुसूची यांद्वारे निरसित.

---

१. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे 'प्रांतिक सरकार' याऐवजी 'राज्य शासन' हा शब्दोल्लेख घातला.

## THE GUARDIANS AND WARDS ACT, 1890

## पालक आणि पाल्य अधिनियम, १८९०

### इंग्रजी–मराठी–शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abuse of trust | विश्वासाचा दुरुपयोग | [S. 39(*a*)] |
| account for | ––चा हिशेब देणे | [S. 34(*a*)] |
| accounts | हिशेब | [S. 34(*d*)] |
| accrue | उपार्जित होणे | [S. 39-Proviso-a] |
| act upon | ––अनुसार कृती करणे | [S. 33(3)] |
| adduce | रुजू करणे | [S. 13] |
| administration bond | प्रशासन बंधपत्र | [S. 35-m.n.] |
| admission | स्वीकृत करणे | [S. 11-m.n.] |
| advancement | विकास | [S. 34(*e*)] |
| adverse interest | विरोधी हितसंबंध | [S. 39-proviso-a] |
| affected | झळ पोचलेला | [S. 30] |
| agree upon | ––बाबत मतैक्य होणे | [S. 43(2)] |
| allowance | भत्ता | [S. 22(1)] |
| amend | विशोधित करणे | [Long title] |
| appealable | अपीलपात्र | [S. 47-m.n.] |
| appear in public | लोकांसमोर येणे | [S. 12(2)] |
| application | १. अर्ज | [S. 4(5)(*a*)] |
| | २. विनंती | [S. 10(1)] |
| apply | विनंती करणे | [S. 33-m.n.] |
| appoint | १. नियत करणे | [S. 12(1)] |
| | २. नियुक्त करणे | [S. 4(5)(*a*)] |
| appoint by name | नामनिर्देश करून नियुक्ती करणे | [S. 4(6)] |
| appoint by virtue of office | पदाधिकारपरत्वे नियुक्ती करणे | [S. 4(6)] |
| appraise of | विदित करणे | [S. 14(1)] |
| approximate value | अदमासे मूल्य | [S. 10(1)(*c*)] |
| ascertain | निश्चित करणे | [S. 10(1)] |
| assign | अभिहस्तांकित करणे | [S. 35] |
| attain majority | सज्ञान होणे | [S. 4(1)] |
| attend/attendance | समक्ष हजर राहणे | [S. 33(2)] |
| at the instance of | ––च्या सांगण्यावरून | [S. 30] |
| audit accounts | हिशेब तपासणे | [S. 34A] |
| bankruptcy | दिवाळखोरी | [S. 39(*i*)] |
| beneficiary | लाभाधिकारी | [S. 37] |
| benefit | हित | [S. 27] |
| call for | मागवणे | [S. 50(1)(*a*)] |
| call upon | फर्मावणे | [S. 46(1)] |
| care | देखभाल | [S. 4(2)] |
| carry out the undertaking | अभिवचन पुरे करणे | [S. 45(2)] |
| ceremony | संस्कार-समारंभ | [S. 34(*e*)] |
| certificate of administration | प्रशासन प्रमाणपत्र | [S. 51] |
| charge with | ––चा भार टाकणे | [S. 25(1)] |
| Chartered High Courts | सनदी उच्च न्यायालये | [S. 3-m.n.] |
| chief officer | मुख्य अधिकारी | [S. 4(6)] |
| civil jail | दिवाणी तुरुंग | [S. 49] |
| class of persons | व्यक्तिवर्ग | [S. 4(6)] |
| compel | १. भाग पाडणे | [S. 46(2)] |
| | २. सक्ती करणे | [S. 12(2)] |
| competent legislature | सक्षम विधानमंडळ | [S. 3] |
| consolidate | एकत्रित करणे | [Long title] |
| contest | ––ला हरकत घेणे | [S. 48] |
| contumacious disregard | बिनदिक्कतपणे अनादर करणे | [S. 39(*e*)] |
| contumacy | आज्ञाभंग | [S. 45-m.n.] |
| costs | दावाखर्च | [S. 49-m.n.] |
| court-house | न्यायगृह | [S. 11(1)(*b*)] |

एच ४८०८-४ (५३२-२-८१)

| | | |
|---|---|---|
| Court of Wards | पाल्याधिकरण | [S. 3] |
| covenant | ठराव | [S. 31(3)(*c*)] |
| customs and manners | रूढिरिवाज | [S. 12(2)] |
| deal with | वहिवाटणे | [S. 27] |
| declaration | १. घोषणा | [S. 28] |
| | २. घोषित करणे | [Chap.II-heading] |
| | ३. अधिकथन | [S. 10(3)] |
| defect of character | चारित्र्यदोष | [S. 39(*f*)] |
| deliver (statement) | (विवरणपत्र) सादर करणे | [S. 34(*b*)] |
| deliver into the custody of | —च्या स्वाधीन करणे | [S. 25(1)] |
| derogate from | —चे न्यूनीकरण करणे | [S. 3] |
| disburse | खर्च भागवणे | [S. 31(3)(*d*)] |
| discharge | *n.* कार्यमुक्तता | [S. 40-m.n.] |
| | vb. १. कार्यमुक्त करणे | [S. 40(1)] |
| | २. पार पाडणे | [S. 39-proviso-b] |
| dispose of | १. विल्हेवाट करणे | [S. 28] |
| | २.—चा निकाल करणे | [S. 4A(1)] |
| dispossess | कब्जा काढून घेणे | [S. 12(3)(*b*)] |
| do one's utmost | शिकस्त करणे | [S. 45(1)(*a*)] |
| due course of law | रीतसर विधिक्रम | [S. 12(3)(*b*)] |
| due on accounts | हिशेबाप्रमाणे देय | [S. 34(*d*)] |
| due to or from | —प्रत किंवा—कडून देय | [S. 34(*b*)] |
| duties of trust | विश्वासमूलक कर्तव्ये | [S. 39(*b*)] |
| enforce | अंमलात आणणे | [S. 25(1)] |
| enforcement | बजावणी | [S. 43-m.n.] |
| engage | बांधून घेणे | [S. 34(*a*)] |
| engagement | वचनबंधन | [S. 35] |
| entertain | विचारार्थ स्वीकारणे | [S. 4(5)(*a*)] |
| enure for the benefit of | —च्या उपयोगाला येणे | [S. 34(*a*)] |
| evident advantage | उघड फायदा | [S. 31(1)] |
| exhibit (accounts) | (हिशेब) सादर करणे | [S. 34(*c*)] |
| expressly or impliedly | स्पष्टपणे किंवा उपलक्षणेने | [S. 50(1)] |
| faithful performance | इमानदारीने पार पाडणे | [S. 39(*g*)] |
| form an intelligent preference | अक्कलहुशारीने मनपसंती ठरवणे | [S. 17(3)] |
| guardian | पालक | [S. 4(2)] |
| guardianship | पालकत्व | [S. 7-m.n.] |
| have the care | —कडे देखभाल असणे | [S. 4(2)] |
| hearing 1. (of application) | (अर्जाची) सुनावणी | [S. 13] |
| 2. (of evidence) | (पुरावा) ऐकणे | [S. 13-m.n.] |
| impracticable | दुष्कर | [S. 39-proviso-*b*] |
| in charge of | प्रभारी | [S. 4(6)] |
| in consideration of | —च्या प्रतिफलार्थ | [S. 31(3)(*c*)] |
| in contravention of | —चे व्यतिक्रमण करून | [S. 30] |
| influence | प्रभाव | [S. 20(2)] |
| in good faith | प्रामाणिकपणे | [S. 33(3)] |
| in ignorance of | माहीत नसताना | [S. 39-proviso-a] |
| in one's discretion | स्वविवेकानुसार | [S. 31(3)] |
| injunction | व्यादेश | [S. 43(4)] |
| in opposition to | —ला विरोध करण्यासाठी | [S. 31(4)] |
| insolvency | नादारी | [S. 39(*i*)] |
| institute a suit | दावा मांडणे | [S. 36(1)] |
| instrument | संलेख | [S. 7(2)] |
| in support of | —च्या पुष्ट्यर्थ | [S. 13] |
| intended sale | नियोजित विक्री | [S. 31(3)(*b*)] |
| interim protection | दरम्यानच्या काळात संरक्षण | [S. 12-m.n.] |
| interlocutory order | अंतर्वादिक आदेश | [S. 12-m.n.] |
| in the discretion | विवेकाधीन | [S. 49] |
| in virtue of office | पदाधिकारपरत्वे | [S. 18-m.n.] |
| joint guardians | संयुक्त पालक | [S. 38-m.n.] |

| | | |
|---|---|---|
| lease | १. n. भाडेपट्टा | [S. 31(3)(*c*)] |
| | २. vb. भाडेपट्टयाने देणे | [S. 29(*b*)] |
| leave | अनुज्ञा | [S. 26(2)] |
| maintain | १. ––चा निर्वाह चालवणे | [S. 49] |
| | २. चालू ठेवणे | [S. 39-proviso-a] |
| maintenance | निर्वाह | [S. 34(*e*)] |
| majority | सज्ञानत्व | [S. 4(1)] |
| make charge | खर्च आकारणे | [S. 11(3)] |
| make profit | फायदा उठवणे | [S. 20(1)] |
| management | व्यवस्थापन | [S. 33-m.n.] |
| man of ordinary prudence | सर्वसामान्य व्यवहारदृष्टीचा मनुष्य | [S. 27] |
| matter in difference | मतभेदाची बाब | [S. 43(2)] |
| minor | अज्ञान व्यक्ती | [S. 4(1)] |
| next friend | इष्टमित्र | [S. 36(1)] |
| office | कार्यपद | [S. 40(1)] |
| ordinary original civil jurisdiction | साधारण अव्वल दिवाणी अधिकारिता | [S. 4(4)] |
| ordinary residence | सर्वसामान्यपणे राहण्याचे ठिकाण | [S. 10(*a*)] |
| otherwise than by due course of law | रीतसर विधिक्रम न अनुसरता अन्यथा | [S. 12(3)(*b*)] |
| parent | आई–वा–बाप | [S. 17(2)] |
| person | १. व्यक्ती | [S. 4(2)] |
| | २. देह | [S. 4(2)] |
| person interested | हितसंबंधित व्यक्ती | [S. 39] |
| petition | लेखी अर्ज | [S. 10(1)] |
| plaint | वादपत्र | [S. 10(1)] |
| plaintiff | वादी | [S. 43(4)] |
| premium | अधिमूल्य | [S. 31(3)(*c*)] |
| proceedings | १. कार्यवाही | [S. 14(1)] |
| | २. कामकाज | [S. 43-m.n.] |
| proclamation | जाहीरनामा | [S. 31(3)(*b*)] |
| production | हजर करणे | [S. 12-m.n.] |
| propose | पुरस्कृत करणे | [S. 11(1)(*a*)(*iii*)] |
| proposed guardian | पुरस्कृत पालक | [S. 10(1)(i)] |
| public auction | जाहीर लिलाव | [S. 31(3)(*b*)] |
| realisation | प्राप्ती | [S. 27] |
| recite | उद्देशिकेत उल्लेख करणे | [S. 31(2)] |
| recusancy | न जुमानणे | [S. 45(1)] |
| removal | १. काढून टाकणे | [S. 7(2)] |
| | २. दूर हलवणे | [S. 44-m.n.] |
| remove | १. काढून टाकणे | [S. 44] |
| | २. दूर हलवणे | [S. 39] |
| report | कळवणे | [S. 14(2)] |
| require | १. आवश्यक करणे | [S. 11(2)] |
| | २. मागवणे | [S. 50(1)(*b*)] |
| requisition | आज्ञा | [S. 34A] |
| result | निष्पत्ति | [S. 10(1)(*g*)] |
| revenue-administration | महसूल प्रशासन | [S. 4(6)] |
| scale | प्रमाण | [S. 50(1)(*ff*)] |
| securities | रोखे | [S. 31(3)(*d*)] |
| securities for money | पैशांबद्दलचे रोखे | [S. 50(1)(*g*)] |
| simultaneous proceedings | एकसमयावच्छेदी कार्यवाही | [S. 14-m.n.] |
| situation | जागा | [S. 10(1)(*c*)] |
| special notice | खास नोटीस | [S. 11(1)(*a*)(*iv*)] |
| statement | १. कथन | [S. 31(4)] |
| | २. विवरणपत्र/विवरण | [S. 34(*b*)] |
| stay | स्थगित करणे | [S. 14(1)] |
| summary disposal | संक्षेपतः निकालात काढणे | [S. 33-(2)] |
| survivor | उत्तरजीवी व्यक्ती | [S. (38)] |
| survivorship | उत्तरजीवित्व | [S. 38-m.n.] |

| | | |
|---|---|---|
| take down from one's dictation | —ने सांगितल्याबरहुकूम उतरून घेणे | [S. 31(2)] |
| take up residence | राहू लागणे | [S. 39-proviso-5] |
| testamentary guardian | मृत्युपत्रीय पालक | [S. 28-m.n.] |
| the Court | न्यायालय | [S. 4(5)(*a*)] |
| title | नाव | [S. 1-m.n.] |
| transactions | संव्यवहार | [S. 20(2)] |
| transfer | १. *n.* हस्तांतरण | [S. 30-m.n.] |
| | २. vb. हस्तांतरित करणे | [S. 28] |
| | ३. वर्ग करणे | [S. 4(5)(*c*)] |
| treat | समजून चालणे | [S. 46(1)] |
| undertake | अभिवचन देणे | [S. 45(1)] |
| undertaking | अभिवचन | [S. 45(1)] |
| unfit | १. *n.* अपात्र | [S. 41(1)(*d*)] |
| | २. vb. अपात्र करणे | [S. 39(*f*)] |
| verify | सत्यापित करणे | [S. 10(1)] |
| voidable | शून्यकरणीय | [S. 30] |
| ward | पाल्य | [S. 4(3)] |
| with one's own hand | स्वहस्ते | [S. 31(2)] |
| with or without sureties | जामीनदारांसहित किंवा त्यांच्या विना | [S.34 (a)] |

## पालक आणि पाल्य अधिनियम, १८९०

## THE GUARDIANS AND WARDS ACT, 1890

### (मराठी–इंग्रजी–शब्दसूची)

| | | |
|---|---|---|
| अक्कलहुशारीने मनपसंती ठरवणे | form an intelligent preference | [S. 17(3)] |
| अदमासे मूल्य | approximate value | [S. 10(1)(*c*)] |
| अधिकथन | declaration | [S. 10(3)] |
| अधिमूल्य | premium | [S. 31(3)(*c*)] |
| —अनुसार कृती करणे | act upon | [S. 33(3)] |
| अनुज्ञा | leave | [S. 26(2)] |
| अंतर्वादिक आदेश | interlocutory order | [S. 12-m.n.] |
| अपात्र | unfit | [S. 41(1)(*d*)] |
| अपात्र करणे | unfit | [S. 39(*f*)] |
| अपीलपात्र | appealable | [S. 47-m.n.] |
| अभिवचन | undertaking | [S. 45(1)] |
| अभिवचन देणे | undertake | [S. 45(1)] |
| अभिवचन पुरे करणे | carry out the undertaking | [S. 45(2)] |
| अभिहस्तांकित करणे | assign | [S. 35] |
| अंमलात आणणे | enforce | [S. 25(1)] |
| अर्ज | application | [S. 4(5)(*a*)] |
| (अर्जाची) सुनावणी | hearing (of application) | [S. 13] |
| अज्ञान व्यक्ती | minor | [S. 4(1)] |
| आई–वा–बाप | parent | [S. 17(2)] |
| आवश्यक करणे | require | [S. 11(2)] |
| आज्ञा | requisition | [S. 34A] |
| आज्ञाभंग | contumacy | [S. 45-m.n.] |
| इष्टमित्र | next friend | [S. 36(1)] |
| इमानदारीने पार पाडणे | faithful performance | [S. 39(*g*)] |
| उघड फायदा | evident advantage | [S. 31(1)] |
| उत्तरजीवित्व | survivorship | [S. 38-m.n.] |
| उत्तरजीवी व्यक्ती | survivor | [S. 38] |
| उद्देशिकेत उल्लेख करणे | recite | [S. 31(2)] |
| उपार्जित होणे | accrue | [S. 39-proviso-a] |
| एकत्रित करणे | consolidate | [Long title] |
| एकसमयावच्छेदी कार्यवाही | simultaneous proceedings | [S. 14-m.n.] |
| —कडे देखभाल असणे | have the care | [S. 4(2)] |
| कथन | statement | [S. 31(4)] |
| कब्जा काढून घेणे | dispossess | [S. 12(3)(*b*)] |
| कळविणे | report | [S. 14(2)] |
| काढून टाकणे | 1. remove | [S. 39] |
| | 2. removal | [S. 7(2)] |
| कामकाज | proceedings | [S. 43-m.n.] |
| कार्यपद | office | [S. 46(1)] |
| कार्यमुक्त करणे | discharge | [S. 40(1)] |
| कार्यमुक्तता | discharge | [S. 40-m.n.] |
| कार्यवाही | proceedings | [S. 14(1)] |
| खर्च आकारणे | make charge | [S. 11(3)] |
| खर्च भागवणे | disburse | [S. 31(3)(*d*)] |
| खास नोटीस | special notice | [S. 11(1)(*a*)(*iv*)] |
| घोषणा | declaration | [S. 28] |
| घोषित करणे | *n.* declaration | [Chap. II-heading] |
| —चा निकाल करणे | dispose of | [S. 4A(1)] |
| —चा निर्वाह चालवणे | maintain | [S. 49] |
| —चा भार टाकणे | charge with | [S. 25(1)] |
| चारित्र्यदोष | defect of character | [S. 39(*f*)] |
| —चा हिशेब देणे | account for | [S. 34(*a*)] |
| —चे न्यूनीकरण करणे | derogate from | [S. 3] |
| —चे व्यतिक्रमण करून | in contravention of | [S. 30] |

| | | |
|---|---|---|
| ––च्या उपयोगाला येणे | enure for the benefit of | [S. 34(*a*)] |
| ––च्या पुष्टयर्थ | in support of | [S. 13] |
| ––च्या प्रतिफलार्थ | in consideration of | [S. 31(3)(*c*)] |
| ––च्या सांगण्यावरून | at the instance of | [S. 30] |
| ––च्या स्वाधीन करणे | deliver into the custody of | [S. 25(1)] |
| जागा | situation | [S. 10(1)(*c*)] |
| जामीनदारांसहित किंवा त्यांच्या विना | with or without sureties | [S. 34] |
| जाहीरनामा | proclamation | [S. 31(3)(*b*)] |
| जाहीर लिलाव | public auction | [S. 31(3)(*b*)] |
| झळ पोचलेला | affected | [S. 30] |
| ठराव | covenant | [S. 31(3)(*c*)] |
| दरम्यानच्या काळात संरक्षण | interim protection | [S. 12-m.n.] |
| दावाखर्च | costs | [S. 49-m.n.] |
| दावा मांडणे | institute a suit | [S. 36(1)] |
| दिवाणी तुरुंग | civil jail | [S. 49] |
| दिवाणी प्रक्रिया संहिता | Code of Civil Procedure | [S. 11(1)(a)] |
| दिवाळखोरी | bankruptcy | [S. 39(*i*)] |
| दुष्कर | impracticable | [S. 37-proviso-b] |
| देखभाल | care | [S. 4(2)] |
| देह | person | [S. 4(2)] |
| न जुमानणे | recusancy | [S. 45(1)] |
| नादारी | insolvency | [S. 39(*i*)] |
| नामनिर्देश करून नियुक्ती करणे | appoint by name | [S. 4(6)] |
| नाव | title | [S. 1-m.n.] |
| नियत करणे | appoint | [S. 12(1)] |
| नियुक्त करणे | *vb.* appoint | [S. 4(5)(*a*)] |
| नियोजित विक्री | intended sale | [S. 31(3)(*b*)] |
| निर्वाह | maintenance | [S. 34(*e*)] |
| निश्चित करणे | 1. define | [S. 26(2)] |
| | 2. ascertain | [S. 10(2)] |
| निष्पत्ति | result | [S. 10(2)(*g*)] |
| –ने सांगितल्याबरहुकूम उतरून घेणे | take down from one's dictation | [S. 31(2)] |
| न्यायगृह | court-house | [S. 11(1)(*b*)] |
| न्यायालय | the Court | [S. 4(5)(*a*)] |
| पदाधिकारपरत्वे | in virtue of office | [S. 18-m.n.] |
| पदाधिकारपरत्वे नियुक्ती करणे | appoint by virtue of office | [S. 4(6)] |
| पार पाडणे | discharge | [S. 39-proviso-b] |
| पालक | guardian | [S. 4(2)] |
| पालकत्व | guardianship | [S. 7-m.n.] |
| पाल्य | ward | [S. 4(3)] |
| पाल्याधिकरण | Court of Wards | [S. 3] |
| पुरस्कृत करणे | propose | [S. 11(1)(*a*)(*iii*)] |
| पुरस्कृत पालक | proposed guardian | [S. 10(1)(*i*)] |
| (पुरावा) ऐकणे | hearing of evidence | [S. 13-m.n.] |
| पैशांबद्दलचे रोखे | securities for money | [S. 50(1)(*g*)] |
| –प्रत किंवा–कडून देय | due to or from | [S. 34(*b*)] |
| प्रभारी | in charge of | [S. 4(6)] |
| प्रभाव | influence | [S. 20(2)] |
| प्रमाण | scale | [S. 50(2)(*ff*)] |
| प्रशासन प्रमाणपत्र | certificate of administration | [S. 51] |
| प्रशासन बंधपत्र | administration bond | [S. 35-m.n.] |
| प्राप्ति | realisation | [S. 27] |
| प्रामाणिकपणे | in good faith | [S. 33(3)] |
| फर्मावणे | call upon | [S. 46(1)] |
| फायदा उठवणे | make profit | [S. 20(1)] |
| बजावणी | enforcement | [S. 43-m.n.] |
| बांधून घेणे | engage | [S. 34(*a*)] |
| –बाबत मतैक्य होणे | agree upon | [S. 43(2)] |
| बिनदिक्कतपणे अनादर करणे | contumacious disregard | [S. 39(*e*)] |
| भत्ता | allowance | [S. 22(1)] |

| | | |
|---|---|---|
| भाग पाडणे | compel | [S. 46(2)] |
| भाडे पट्टा | lease | [S. 31(3)(*c*)] |
| भाडेपट्टयाने देणे | lease | [S. 29(*b*)] |
| मतभेदाची बाब | matter in difference | [S. 43(2)] |
| महसूल-प्रशासन | revenue-administration | [S. 4(6)] |
| मागवणे | 1. call for | [S. 50(1)(*a*)] |
| | 2. require | [S. 50(1)(*b*)] |
| माहीत नसताना | in ignorance of | [S. 39-proviso-a] |
| मुख्य अधिकारी | chief officer | [S. 4(6)] |
| मृत्युपत्रीय पालक | testamentary guardian | [S. 28-m.n.] |
| राहू लागणे | take up residence | [S. 39-proviso-b] |
| रीतसर विधिक्रम | due course of law | [S. 12(3)(*h*)] |
| रीतसर विधिक्रम न अनुसरता अन्यथा | otherwise than by due course of law | [S. 12(3)(*b*)] |
| रुजू करणे | adduce | [S. 13] |
| रूढिरिवाज | customs and manners | [S. 12(2)] |
| रोखे | securities | [S. 31(3)(*d*)] |
| लाभाधिकारी | beneficiary | [S. 37] |
| –ला विरोध करण्यासाठी | in opposition to | [S. 31(4)] |
| –ला हरकत घेणे | contest | [S. 48] |
| लेखी अर्ज | petition | [S. 10(1)] |
| लोकांसमोर येणे | appear in public | [S. 12(2)] |
| वचनबंधन | engagement | [S. 35] |
| वर्ग करणे | transfer | [S. 4(5)(*c*)] |
| वहिवाटणे | deal with | [S. 27] |
| वादपत्र | plaint | [S. 10(1)] |
| वादी | plaintiff | [S. 43(4)] |
| विकास | advancement | [S. 34(*e*)] |
| विचारार्थ स्वीकारणे | entertain | [S. 4(5)(*a*)] |
| विदित करणे | appraise of | [S. 14(1)] |
| विनंती | application | [S. 10(1)] |
| विनंती करणे | apply | [S. 33-m.n.] |
| विरोधी हितसंबंध | adverse interest | [S. 39-proviso-a] |
| विल्हेवाट करणे | dispose of | [S. 28] |
| विवरण | statement | [S. 34(*b*)] |
| विवरणपत्र | statement | [S. 34(*b*)] |
| (विवरणपत्र) सादर करणे | deliver (statement) | [S. 34(*b*)] |
| विवेकाधीन | in the discretion | [S. 49] |
| विशोधित करणे | amend | [Long title] |
| विश्वासमूलक कर्तव्ये | duties of trust | [S. 39(*b*)] |
| विश्वासाचा दुरुपयोग | abuse of trust | [S. 39(*a*)] |
| व्यक्ति | person | [S. 4(2)] |
| व्यक्तिवर्ग | class of persons | [S. 4(6)] |
| व्यवस्थापन | management | [S. 33-m.n.] |
| व्यादेश | injunction | [S. 43(4)] |
| शिकस्त करणे | do one's utmost | [S. 45(1)(*a*)] |
| शून्यकरणीय | voidable | [S. 30] |
| संयुक्त पालक | joint guardians | [S. 38-m.n.] |
| संलेख | instrument | [S. 7(2)] |
| संव्यवहार | transactions | [S. 20(2)] |
| संस्कार-समारंभ | ceremony | [S. 34(*e*)] |
| संक्षेपतः निकालात काढणे | summary disposal | [S. 33(2)] |
| सक्ती करणे | compel | [S. 12(2)] |
| सत्यापित करणे | *vb.* verify | [S. 10(1)] |
| सनदी उच्च न्यायालये | Chartered High Courts | [S. 3-m.n.] |
| समजून चालणे | treat | [S. 46(1)] |
| समक्ष हजर राहणे | 1. *vb.* attend | [S. 33(2)] |
| | 2. *n.* attendance | [S. 46(2)] |
| स्पष्टपणे किंवा उपलक्षणेने | expressly or impliedly | [S. 50(1)] |
| सर्वसामान्यपणे राहण्याचे ठिकाण | ordinary residence | [S. 10(*a*)] |
| सर्वसामान्य व्यवहारदृष्टीचा मनुष्य | man of ordinary prudence | [S. 27] |

| | | |
|---|---|---|
| सक्षम विधानमंडळ | competent legislature | [S 3] |
| सज्ञानत्व | majority | [S. 4(1)] |
| सज्ञान होणे | attain majority | [S. 4(1)] |
| साधारण अव्वल दिवाणी अधिकारिता | ordinary original civil jurisdiction | [S. 4(4)] |
| स्थगित करणे | stay | [S. 14(1)] |
| स्वविवेकानुसार | in one's discretion | [S. 31(3)] |
| स्वहस्ते | with one's own hand | [S. 31(2)] |
| स्वीकृत करणे | admission | [S. 11-m.n.] |
| हजर करणे | production | [S. 12-m.n.] |
| हस्तांतरण | transfer | [S. 30-m.n.] |
| हस्तांतरित करणे | transfer | [S. 28] |
| हित | benefit | [S. 27] |
| हितसंबंधित व्यक्ती | person interested | [S. 39] |
| हिशेब | accounts | [S. 34(*d*)] |
| हिशेब तपासणे | audit accounts | [S. 34A] |
| (हिशेब) सादर करणे | exhibit (accounts) | [S. 34(*d*)] |
| हिशेबाप्रमाणे देय | due on accounts | [S. 34(*d*)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई